शुक्रवार, १९ एप्रिल २०२४
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - २३३
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) FRIDAY 19 APRIL 2024 | adhunikkesari.com | ●YEAR-03 ●ISSUE-233 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-05


# माझी लढाई अदृश्य शक्तींच्या विरोधात : सुप्रियाताई सुळे

आधुनिक केसरी न्यूज



**पुणे :** आमच्या विरोधात १८ वर्षांत न बोलणारे आज आमच्याविरोधात वैयक्तिक टीका करत आहेत. मी आणि अमोलदादा कुणावरही अशी टीका करत नाही. ही निवडणूक आता महाराष्ट्राच्या मायबाप जनतेने हातात घेतली आहे. लोकं दबक्या आवाजात फोन करतात आणि मला सांगतात मला धमकीचे फोन आले होते. पण सगळ्यांना मी सांगते जो तुम्हाला धमक्या देतो आहे ना त्याला फक्त माझा नंबर द्या, असे सुप्रियाताई सुळे म्हणाल्या.

केंद्रातील सरकारने गेल्या दहा वर्षांत सर्वसामान्य जनतेला केवळ फसवण्याच काम केल आहे असा हल्लाबोल राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी पुण्यातील महाविकास आघाडीच्या जाहीर सभेतून केला आहे. महाविकास आघाडीचे बारामतीच्या उमेदवार सुप्रियाताई सुळे, शिरूरचे उमेदवार डॉ. अमोल कोल्हे, पुण्याचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांचा उमेदवारी अर्ज आज दाखल करण्यात आला. त्यानंतर महाविकास आघाडीच्या जाहीर सभेतून शरद पवार साहेब यांनी भाजपवर हल्लाबोल केला आहे.

शरद पवार म्हणाले की, पेट्रोल, गॅस सिलेंडर आणि नोकऱ्यांच्या आघाडीवर सत्ताधाऱ्यांनी जनतेच्या तोंडाला पानं पुसण्याचे काम केली. शब्द द्यायचा, आश्वासनं द्यायची आणि ती पाळायची नाहीत, अशी जर मोदी नीती असेल तर त्यांना पुन्हा सत्तेत न बसविण्याचे आवाहन शरद पवार यांनी जनतेला केले आहे.

पुढे शरद पवार म्हणाले की, नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वाखालील सरकारने शेतकरी, महिला, रोजगार या बाबत दिलेली आश्वासने आणि वस्तुस्थिती यात फरक आहे. दरवर्षी दोन कोटी मुलांना नोकऱ्या देण्याचे आश्वासन पतंप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिले होते. पण गेल्या दहा वर्षांत नोकऱ्या कमी आहे. सध्या देशातील तरुणाईचा जो आकडा आहे, त्यातील ८६ टक्के मुलं ही बेरोजगार आहेत. त्यांच्या हाताला काम नाही. आजचा दिवस उमेदवारीचा अर्ज भरण्याचा दिवस आहे. कार्यकर्त्यांमध्ये आज प्रचंड उत्साह पाहण्यास मिळाला. त्यामुळे तुम्ही नक्कीच जोमाने काम करणार याचा मला विश्वास आहे. १० वर्षे सत्ता असणाऱ्या सत्ताधारी लोकांनी फसवलं आहे. २०१४ मोदी सत्तेत आले त्यावेळेस पेट्रोल ७१ रुपये लिटर होतं. आज पेट्रोल १०५ रुपये आहे. सत्तेचा उन्माद काय असतो ही बाब सत्ताधारी लोकांनी दाखवून दिली आहे. आता मोदींना सत्ता द्यायची नाही याचा निर्णय घ्यावा लागेल. मोदींवर टीका केली म्हणून झारखंडचे मुख्यमंत्री, दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल, बंगालचे तीन मंत्री तुरुंगात गेले. देशातील लोकशाही उद्ध्वस्त होत आहे. सत्तेचा उन्माद काय असतो हे मोदींनी दाखवले आहे. मोदींचा पराभव करण्यासाठी तयार रहा, असेही शरद पवार म्हणाले.

**खोके सम्राट, पलटुसम्राट परवडत नाही :अमोल कोल्हे**

आता फक्त ट्रेलर दाखवतो . पिक्चर दाखवायला आपल्याकडं लय वेळ हाय . एक गोष्ट प्रकर्षाने जाणवत आहे की, महाराष्ट्रातल्या आणि देशातल्या जनतेचे ठरलंय, बळकट हाताने स्वाभिमानाची मशाल पेटवायची अन् विजयाची तुतारी फुंकायची . मी पहिल्यांदा संसदेत गेलो तेव्हा मला सुपियाताई सुळे यांनी सांगितले होते की, जेव्हा जनतेच्या धोरणाविषयी चर्चा होईल, देशाच्या भवितव्याविषयी चर्चा होईल तेव्हा डोळ्यात तेल घालून जागा रहा . तेव्हा तुझा आवाज सर्व सामान्य लोकांसाठी गरजला पाहिजे, हे सुप्रियाताई सुळेंनी मला शिकवले असे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शिरूरचे उमेदवार अमोल कोल्हे म्हणाले .

अमोल कोल्हे म्हणाले की, नटसम्राट परवडतो, कार्यसम्राट परवडतो . पण धोके सम्राट, खोके सम्राट, पलटुसम्राट परवडत नाही . आता हे म्हणतायेत कचाकचा बटन दाबा, पाहिजे तेवढा निधी देतो . कर काय ह्यांच्या खिशातला आहे का ? अहो आम्हा जनतेकडून तुम्ही कर घेता अन् त्या कराच्या जोरावर तुम्ही कचाकचा बटन दाबायला सांगता का ? असा सवालदेखील अमोल कोल्हे यांनी उपस्थित केला .

# विकासात अडथळा ठरणाऱ्या भाजपाला निवडणुकीत जनताच धडा शिकवणार

## नाना पटोले :हजारोंच्या उपस्थितीत प्रणिती शिंदेंचा अर्ज दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : नरेंद्र मोदी यांनी मागील १० वर्षात देशाला अधोगतीकडे नेले आहे. मोदींनी जनतेला दिलेले एकही आश्वासन पूर्ण केलेले नाही. सर्व पक्षातील भ्रष्टाचारी नेत्यांना भाजपात घेणारे मोदी हे भ्रष्टाचाऱ्यांचे सरदार आहेत. भारत जोडो यात्रेच्या माध्यमातून राहुल गांधी यांनी सर्व समाज घटकांच्या समस्या, वेदना, दुःख जाणून घेतले व त्यांना प्रचंड जनसमर्थनही लाभले आहे. नरेंद्र मोदी हे फेल झालेले इंजिन असून राहुल गांधींचे इंजिनच देशाला प्रगतीपथावर घेऊन जाईल, असा विश्वास महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी व्यक्त केला आहे.**



सोलापूर लोकसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीच्या उमेदवार प्रणिती शिंदे यांचा उमेवारी अर्ज काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष पटोले यांच्या उपस्थितीत भरला, त्यानंतर पत्रकारांशी ते बोलत होते. नाना पटोले म्हणाले की, भारतीय जनता पक्षाने राज्यातील घरे फोडून संस्कृती खराब करण्याचा प्रयत्न केला आहे. मोदी-शहा यांना खूश करण्यासाठी एकनाथ शिंदे व अजित पवार हे राहुल गांधी यांच्यावर टीका करतात पण त्याचा काही फरक पडणार नाही. सोलापुरच्या विकासात भाजपा हा मोठा अडसर ठरला आहे, हा अडसर लोकसभा निवडणुकीत दूर करा, असे आवाहनही पटोले यांनी केले.

आ. प्रणिती शिंदे यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी जाहीर सभा पार पडली व त्यानंतर भव्य रॅली काढण्यात आली. यावेळी प्रणिती शिंदे म्हणाल्या की, भाजपने १० वर्षात विश्वासाने सोलापुरकरांचा वापर करून मतदान घेतले आणि सत्तेची मजा घेतली आणि लोकांना गरज असताना त्यांच्याकडे पाठ फिरवली. ही लढाई आपल्या सगळ्यांची असून निवडणुकीत भाजपाला जागा दाखवून द्या. सोलापूरला विकासाच्या आणि प्रगतीच्या वाटेवर आणण्यासाठी या लढाईत विजयी होण्यासाठी आर्शीवाद द्यावा, असे आवाहन प्रणिती शिंदेंनी केले.






# श्रीराम साधना आश्रमातील श्रीराम जन्मोत्सव सोहळ्याची दहीहंडी फोडून सांगता

आधुनिक केसरी न्यूज

नेवासा : तालुक्यातील मुकिंदपूर चारी क्रमांक तीन जवळ असलेल्या श्रीराम साधना आश्रमामध्ये आठ दिवस चाललेल्या श्रीराम जन्मोत्सव सोहळयाची सांगता गुरुवारी दि.१८ एप्रिल रोजी आश्रमाचे प्रमुख महंत स्वामी सुनीलगिरीजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली हभप पांडुरंग महाराज गिरी वावीकर यांच्या हस्ते काल्याची दहीहंडी फोडून सांगता करण्यात आली. द्वापार युगामध्ये भगवान श्रीकृष्ण परमात्म्याने अठरापगड जातीच्या सर्व सवंगड्यांना बरोबर घेऊन निर्माण केलेला काला हा सामाजिक एकता अखंडता व ऐक्य जोपासणारा असल्याचे प्रतिपादन हभप पांडुरंग महाराज गिरी यांनी यावेळी बोलताना केले.

यावेळी झालेल्या काल्याच्या किर्तन प्रसंगी आलेल्या संत महंतांचे श्रीराम साधना आश्रमाचे प्रमुख महंत स्वामी सुनीलगिरीजी महाराज यांनी स्वागत केले. यावेळी झालेल्या काल्याच्या किर्तन प्रसंगी हभप पांडुरंग महाराज गिरी यांचे संतपूजन संतसेवक गंगाराम निपुंगे व अरुण निपुंगे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी झालेल्या काल्याच्या कीर्तनात बोलतांना हभप गिरी महाराज वावीकर म्हणाले की येथील श्रीराम जन्मोत्सवाच्या निमित्ताने आयोजित तुळसी रामायण कथा व कीर्तन महोत्सव हा दृस्ट व नजर लागण्यासारखा झाला आहे,येथील वातावरण इतके मंगलमय बनले की पांडुरंग परमात्मा देखील पंढरपूर सोडून येथे आला असेल असे सांगून त्यांनी जंगल मध्ये मंगल करण्याचे पवित्र कार्य महंत सुनीलगिरीजी महाराज यांनी श्रीराम साधना आश्रमाच्या माध्यमातून केले असल्याचे गौरवोदगार त्यांनी


यावेळी बोलताना काढले. यावेळी झालेल्या काला किर्तन प्रसंगी हभप वावीकर महाराज यांनी भगवान श्रीकृष्ण परमात्म्याच्या बाललीलांचे वर्णन केले,आपल्याला परमार्थ सुखाची प्राप्ती करून देणारा रामजन्म कथा असल्याचे त्यांनी सांगितले. अशी कथा येथे करून महंत सुनीलगिरीजी महाराजांनी आपले



तप, पुण्य याकामी खर्च घातले. येथे श्रद्धा आहे म्हणूनच संत याठिकाणी येतात. भगवान श्रीकृष्ण परमात्म्याने जसे अठरापगड जातीच्या सवंगड्यांना बरोबर घेऊन काला केला तो काला राष्ट्रीय ऐक्याचे प्रतीक असून आज जातीपातीचे गट तट निर्माण होताना दिसत आहे यामुळे देशाच्या अखंडतेला मोठा धोका असल्याची शक्यता व भीती त्यांनी यावेळी बोलताना व्यक्त केली तर महंत सुनीलगिरीजी महाराज यांनी जंगलात असलेल्या श्रीराम साधना आश्रमाला अध्यात्मिक ताकदीवर जंगलमध्ये मंगल करणारे असल्याचे गौरवोदगार हभप पांडुरंग महाराज गिरी वावीकर यांनी यावेळी बोलताना काढले.

यावेळी काल्याची दहीहंडी फोडून आठ दिवस चाललेल्या कथा व किर्तन सोहळयाची सांगता करण्यात आली. आठ दिवस पाच ते सहा हजारापर्यंत अन्नदान करणाऱ्या दात्यांचा तसेच आर्थिक पाठबळ देणाऱ्या भाविकांचा हभप पांडुरंग महाराज गिरी वावीकर यांच्या हस्ते श्रीफळ प्रसाद देऊन सन्मान करण्यात आला. कथेचे व कीर्तनाचे प्रक्षेपण सेवा देण्यासाठी योगदान देणारे नेवासाफाटा प्रेस क्लबचे अध्यक्ष संदीप गाडेकर यांचा यावेळी टाळ्यांचा गजर करत गौरव करण्यात आला.

यावेळी झालेल्या काल्याच्या किर्तन प्रसंगी पैठण येथील साध्वी सुवर्णानंद चैतन्य दीदी, ज्ञानेश्वर महाराज हजारे, साहेबराव महाराज चावरे, हभप गाडेकर महाराज, हभप चिंधे महाराज, भानुदास महाराज भिसे,शंकर महाराज तनपुरे, सर्प मित्र चिंधे पाटील, वेदशास्त्रसंपन्न ग्राम पुरोहित प्रकाश गुरू मुळे, शुभम महाराज लहारे यांच्यासह हजारो भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. महंत सुनीलगिरीजी महाराज यांनी सोहळयासाठी योगदान देणाऱ्यांचे आभार मानले. उपस्थित भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# मंगल भवन अमंगल हारी

आधुनिक केसरी



राम जेव्हा लंकेहून रावणाचा वध करून अयोध्येला परत आले आणि त्यांचा राज्याभिषेक झाला, त्याप्रसंगी अनेक ऋषीमुनी येऊन रामाचं अभिनंदन करत होते, त्याला धन्यवाद देत होते. ते म्हणत होते, ' रामा, तू इंद्रजिताचा वध केलास त्याबद्दल तुझं अभिनंदन आहे. ' प्रत्येकाच्या तोंडून अशा प्रकारचे उदगार ऐकून रामाला आश्चर्य वाटले. त्यांनी ऋषींना विचारलं, ' जो रावण तुमच्या यज्ञात, साधनेत अडथळे आणत होता, त्याचा नाश झाल्याबद्दल तुम्हाला आनंद झाला नाही का ? ती गोष्ट तुम्हाला विशेष वाटत नाही का ? त्याबद्दल माझं अभिनंदन न करता तुम्ही इंद्रजिताच्या वधाबद्दल माझं अभिनंदन करत आहात, ते का ? ' यावर ऋषींनी दिलेलं उत्तर श्रीरामांची थोरवी स्पष्ट करणारं आहे. ते म्हणाले, ' रावणाचा वध तर होणारच होता. त्यात विशेष नाही. पण जो इंद्रजित कोणालाही अजिंक्य होता, त्याचा वध तुझ्या हातून झाला ही विशेष गोष्ट आहे. ' इंद्रजिताचे मूळ नाव मेघनाद. हा रावणाचा शूर, शक्तिशाली असा पुत्र होता. त्याचा पराक्रम एवढा होता की त्याने प्रत्यक्ष देवराज इंद्राचा पराभव करून त्याला बंदी बनवून आणले. इंद्रावर विजय मिळवला म्हणून त्याचे नाव इंद्रजित पडले. ' अशा या इंद्रजितावर रामाने विजय मिळवला. या कथेतून आपल्या असे लक्षात येते की रावणाच्या वधापेक्षा इंद्रजिताचा वध करणे ही कठीण गोष्ट होती. रामाने रावणाचा पराभव करण्यापूर्वी अशा तीन व्यक्ती होत्या की ज्यांनी रावणाचा पराभव केला होता. त्या व्यक्ती म्हणजे बलिराजा, सहस्त्रार्जुन आणि वाली. परंतु रावणाचा पिता असलेले विश्रवाऋषी यांनी विनवणी करून बली आणि सहस्त्रार्जुन यांच्याकडून रावणाची सुटका करून घेतली. तर रावणाने वालीशी तह करून चातुर्याने स्वतःला सोडवून घेतले.



## आनंदी पहाट

# जीवनशैलीचा परिणाम जीवनमानावर होऊ शकतो

आधुनिक केसरी

दिवसेंदिवस निर्माण होत असलेल्या दुराव्याला, रक्ताच्या नात्यातील ओलावा राहण्याची शक्यता कमी होत चाललेली असल्याचे जाणवत आहे. मन आणि तन याचे नाते अतूट असते. मन दिसत नसल्यामुळे ते कळत नाही आणि शरीर मात्र लपत नाही. मनाचा जोपर्यंत तनाशी मिलाफ होत नाही, तोपर्यंत विचार आणि वर्तन यांचे समीकरण जुळत नाही. या बदलत जाणाऱ्या मानसिकतेच्या अनुशंगाने सकारात्मक विचार करण्याची जरुरी असते. सोशल मीडियामुळे आपल्या विचारांची दिशाच बदलत चालली आहे, हे सर्वप्रथम आपण समजून घेतले पाहिजे. आपल्या प्रत्येक विचारांत सकारात्मकता असतेच असे नाही. पण आपल्या मनाच्या स्वास्थ्यासाठी तसा अभ्यासपूर्वक विचार होणे आवश्यक असते. मनाला रमवण्यासाठी आणि नवे आजमावण्यासाठी आपल्याच अंतर्मनाचा मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यासपूर्वक विचार करावा लागतो. सोशल मिडीयाचा वापर किती करायचा, त्या माध्यमातून व्यक्तिगत आणि कौटुंबिक पातळीवर काही बिघडणार तर नाही ना हेही बघणे अत्यंत जरुरीचे असते, हे विसरून चालणार नाही. एकूणच बदलत चाललेली जीवनशैली, जीवनमान, गरजा आणि अपेक्षा ह्या सर्वच बाबींचा समाजमनावर आणि विशेषतः बालमनावर होत असलेला विपरीत परिणाम दुर्लक्षित करून चालणार नाही, हे आपल्या प्रत्येकाने स्मरणात घेतले पाहिजे. अलीकडच्या काळात आपापसातील संवादाची जागा सोशल मिडीयाने घेतली आहे. ज्या सोशल मीडियातील मजकूर, छायाचित्रे आणि चलतचित्रे सर्वकाही आभासी असल्याचे आपल्या सर्वांनाच माहिती आहे; तरीही आपण आपला सोशल मीडियामधील सहभाग मर्यादित ठेवत नाहीत. त्याचे आपण भक्त होऊन आपल्या अंतर्मनाला रमवण्याचा, आनंदी ठेवण्याचा केविलवाणा प्रयत्न करत असतो. आपल्याला दैनंदिन जीवनात निरनिराळे अनुभव येत असतात, ज्यामुळे आपली मानसिकता बदलत असते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

## फिटेल रे दैना | जन्माची ह्या ||

पंचमहाभूते | देहात वसले ||
श्वासाने फुंकले | पंचप्राण ||१||
चांगल्या वांगल्या | गुणांची पेरणी ||
केली उभारणी | बुध्दी सवे ||२||
विकाराने केला | मनाशी शेजार ||
सवे अहंकार | एक झाले ||३||
वांगल्याची मात | चांगल्याची माती ||
भ्रष्ट होय मती | दानवाची ||४||
पूर्व पुण्याईने | लाभला हा देह ||
परी माया मोह | घात करी ||५||
संतांच्या संगती | रमे माझ्या मना ||
फिटेल रे दैना | जन्माची ह्या ||६||




प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८


# भगवंताची स्मृती आणि कर्तव्याची जागृती

आधुनिक केसरी


प्रत्येक मनुष्य बोलताना 'मी' आणि 'माझे' अशा भाषेत बोलत असतो; म्हणजे प्रत्येक व्यक्तीला ह्या दोन्ही बाबतींत काही कर्तव्ये असतात. 'माझे' या शब्दात शरीर आणि तत्संबंधी सर्व गोष्टी येतात. आयुष्यात 'मी' चे कर्तव्य परमेश्वरप्राप्ती हे आहे; आणि देहाचे कर्तव्य देहाशी संबंधित असलेल्या प्रत्येक व्यक्तीबद्दलचे असते.
देहाच्या कर्तव्यात धर्म, शास्त्र आणि नीती यांना धरून, संबंधित व्यक्तीशी करण्याच्या आचरणाचा समावेश होतो; म्हणजेच, ज्याच्याशी जसा आपला संबंध असेल त्याप्रमाणे त्याच्या बाबतीत आपले कर्तव्य चोख पार पाडणे. 'कर्तव्य' याचा अर्थ मोबदल्याची अपेक्षा न ठेवता ज्या ज्या बाबतीत जे करणे योग्य असेल ते करणे, असा आहे. मनुष्याने 'मी' आणि देह या दोहोंच्या बाबतींतली कर्तव्ये समान चालीने करीत राहिले पाहिजे. 'मी' चे कर्तव्य करीन पण देहाने कसाही वागेन, असे म्हणून चालणार नाही. याचे कारण असे आहे की, समजा,



एखादा मनुष्य नोकरी करीत आहे; तो ती नोकरी कशाकरिता करतो याचा विचार केला तर असे दिसते की, ती नोकरी करायला दुसरे कोणी नव्हते म्हणून तो ती नोकरी करीत नसतो, तर त्या नोकरीतून मिळणारा पैसा कुटुंबरक्षणाकरिता उपयोगी पडेल म्हणून तो ती नोकरी करीत असतो. समजा, त्याने नोकरी केली पण मिळणारा पैसा घरात दिला नाही, तर त्या नोकरीचा काही उपयोग नाही. तसे, 'मी' चे कर्तव्य, म्हणजे भगवंताचे अनुसंधान केले, पण देहाचे कर्तव्य, म्हणजे सदाचरण आणि संबंधित व्यक्तींशी असलेली कर्तव्ये न केली, तर नोकरी करून पैसे घरी न दिल्यासारखे होईल. म्हणून प्रत्येक व्यक्तीने भगवंताची स्मृती आणि कर्तव्याची जागृती ठेवावी; आणि या दृष्टीने आपले कुठे चुकते आहे याचा शोध दर वाढदिवसाच्या निमित्ताने घेऊन, प्रत्येकाने आपली उन्नती करून घ्यावी. जेवताना भोवती उदबत्तीचा सुंदर वास आणि तोंडात गोड घास जसा असावा, त्याप्रमाणे आपण बाहेर गोड बोलावे आणि आत भगवंताचे गोड नाम घ्यावे; म्हणजेच, आपण आत-बाहेर गोड असावे. ज्याप्रमाणे एखादा गवई पुष्कळ ताना मारतो, पण शेवटी समेवर येतो, त्याचप्रमाणे भगवंताजवळ लक्ष ठेवून मग आपण काहीही केले तरी हरकत नाही. समेला विसरून मात्र उपयोग नाही. इथे तबला वाजविणारा भगवंतच आहे; म्हणून त्याचा ठेका बरोबर चालतो. ठेक्याप्रमाणे, म्हणजे भगवंताच्या ठेक्याला अनुसरून, म्हणजेच त्याच्या स्मरणात, जो गवई गाईल तो बरोबर मार्गावर राहील आणि शेवटी समेवर येईल. ८८. फळाची अपेक्षा सोडून कर्म करणे याचे नाव कर्तव्य होय.



## हितगुज



पुष्प ४३वे

गुरुमाऊली परमपूज्य अण्णासाहेब मोरे, दिंडोरी (नाशिक)


### कुलदैवत खंडोबा

लोकचैतन्य, लोकमनाच्या उदात्त आविष्कारातून कुलदेवतांचा आविर्भाव झाला. लोकमनाला बळ देणाऱ्या, आधार देणाऱ्या लोकोत्सवांना उंची देणाऱ्या, लोकोपासनांना अध्यात्म देणाऱ्या, लोकश्रद्धांना साकार करणाऱ्या, लोकजीवनाला सुसंस्कारित करणाऱ्या कुलदैवतांचे महत्त्व सर्व युगात अनन्यसाधारण आहे. कुटुंबांना त्यांनी संस्कार व अनुशासन दिले आहे. या कुलदेवतांच्या माध्यमातून अवघा समाज, संपूर्ण राष्ट्र एका कौटुंबिक जिव्हाळ्याने, समानतेने एकात्म बनते. लोकशाही मूर्तिमंत साकारणारी ही कुलदैवते अध्यात्माचे वैभव व लोकजीवनाचे अंतरंग भूषवणारी महान तत्त्वे, महान स्वरूपे आहेत. दगड धोंड्याच्या महाराष्ट्राने सदैव बाह्यरूप साधे, अनलंकृत, सोपे-सुगम ठेवले पण अंतर्यामी महान ज्ञानाच्या राशींनी हा समाज समृद्ध, संपन्न, श्रीमंत राहिला आहे. हेच या महाराष्ट्राचे महावैभव लोकसाहित्य, शिष्टसाहित्य, इतिहासातून दिमाखाने उभे आहे. 'येळकोट येळकोट जय मल्हार' म्हणून भान, चिंता, ममत्व हरपून समर्पित होणारे साधारण माणसाचे मन क्षणात विरागी, तपस्वी होण्याचे सामर्थ्य अशाच लोकाराधनेतून प्राप्त करीत आले आहे. येळकोट म्हणजे सात कोटी गण, त्यावेळी जे सात कोटी होते ते काही पटीत वाढले आहेत. पण सर्वांच्या हृदयातला मंगल, कल्याणकारी, पराक्रमी, विजेता भगवान खंडोबा मात्र एक आहे. कुलधर्माच्या परंपरेत त्यांची आराधना या मातीशी, इतिहासाशी, परंपरेशी, संस्कृतीशी, अध्यात्मज्ञानाशी, समाजमनाशी सर्वांना जोडते. जीवाला शिवत्वाकडे नेणारी संवेदना कुलाचार, कुलधर्मातून उन्नत, विकसित होते. ब्रह्मांडपुराणात 'मल्हारी-माहात्म्य' 22 अध्याय व 940 श्लोकात वर्णिले आहे. त्यानुसार ध्यानमंत्र असा आहे... 'ध्यायेन्मल्हारिदेव कनकगिरिनिभं म्हालसाभूषितांगम्। श्वेताश्वं खड्गहस्तं विबुधबुधगणैः सेव्यमानैः कृतार्थैः ॥ युक्ताघ्रिं दैत्यमूर्ध्निं डमरू विलसितं नैशचूर्ण भिरामं। नित्यं भक्तेषु तुष्टं श्वगणपरिवृत्तं नित्यमोकारगम्यम्॥'

**संकलन : बाजीराव सोनवणे, नाशिक**
**संपर्क क्र. ९९२२४२००३४**

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

परब्रह्म उपलब्धि है, जीते जीव समाधि ।
मरन बाद फिर जनम है, यह जग रोग असाधि ।।०४।।(स्वर्वेद द्वितीय मण्डल अष्टम अध्याय) ०२/०८/०४
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
सहज योग समाधी द्वारे याच शरीराने जीवन्मुक्ती अर्थात परब्रह्माची प्राप्ती होते. मरणानंतर जन्म होतो. या जन्म-मरण रूपी असाध्य रोगाची निवृत्ती प्रभू द्वारा जीवन्मुक्ती झाल्यावर होते. जीवंतपणीच मुक्ती मिळते, मेल्यावर नाही.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सॲप करा ८५५४८८३१६६.

## गुणरूपनिरसन

आधुनिक केसरी

पण संतांनी त्यावर अभ्यास केला व त्याचं महत्व आपल्याला समजून सांगितले. अशा पैकी थोर संत समर्थ रामदास स्वामी यांचे उपकार आपल्यावर आहेत. ह्यासाठी सतत संतवचनावर एकनिष्ठ राहिले पाहिजे. आता आपण पुढील समासाकडे वळूया. मूळमायेत रज,तम,सत्व हे तीन गुण असतात. गुणमाया प्रगट झाली की,या तीन गुणांची एकसारखी अवस्था भंग पावते. रज,तम,सत्व हे तीनही गुण माणसाच्या आयुष्यात असतात. यावर स्थितप्रज्ञ राहून जीवन जगावे हे संस्कार आपल्याला दासबोधातील समासा वरून अभ्यासता येते. पंचमहाभूते आणखी तीन गुण मिळून आठ होतात. ह्यालाच अष्टधा प्रकृति असे म्हणतात. ज्ञान व अज्ञान यांचा विचार मुळमायेमुळेच येतो. मूळमायेमध्ये मी ब्रह्म आहेही ज्ञानरूप जाणीव होते आणि तिच्या मागे अज्ञान रूपी नेणीव प्रगट होते. मूळमाया नसती तर परब्रम्हास स्वतः ची ज्ञानरूप जाणीव झाली नसती. जाणीव निर्माण झाली की नंतर नेणीव स्वाभाविकच पुढे येते. म्हणून जाणीव व नेणीव म्हणजेच ज्ञान व अज्ञान याला मूळमायेखेरीच स्थान नाही. आता हेच बघा ना भलामोठा दगड आहे तो आपल्याला दिसतो पण तो हालचाल करत नाही .जेथे मुळीच हालचाल नाही तेथे जाणीवेने अस्तित्व आहे असे म्हणता येत नाही. म्हणजेच जाणीव हा वायुंचा गुण निश्चित समजावा. फार विचारपूर्वक वाचा म्हणजे समजेल. मूळमायेला वायु का म्हटले जाते? हालचाल होते ही जाणिवेची खूण आहे. वायु सारखा हालचाल करतो. म्हणून जाणीव वायुरूप आहे. परब्रम्हात मूळमाया निर्माण झाली तेव्हा मी ब्रह्म आहे अशी जाणीव निर्माण झाली.ही जाणीव ज्ञानरूप व शक्ति रूप असते. कोणतीही शक्ति हालचाल केल्या शिवाय रहात नाही. म्हणून जाणीव वायुरूप आहे.



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

शुक्रवार, १९ एप्रिल २०२४

adhunikkesari.com


# आदर्श आचारसंहितेचा भंग करणाऱ्या एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेच्या सर्वांची उमेदवारी रद्द करा

## अतुल लोंढे : शिवसेनेच्या जाहीरातींना बेकायदेशीर परवानगी देणाऱ्या एस. टी. महामंडळाच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करा

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** लोकसभा निवडणूक प्रचार सुरु झाल्यापासून सत्ताधारी भाजपा, शिवसेना पक्षाने आदर्श आचारसंहितेचे वारंवार उल्लंघन केले आहे व त्याबाबतची रितसर तक्रारही काँग्रेस पक्षाने निवडणूक आयोगाकडे केलेली आहे. आता पुन्हा एकदा असाच प्रकार उघडकीस आला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसवर बॅनर लावून बेकायदेशीरपणे शिवसेना पक्षाची जाहीरातबाजी करून आदर्श आचारसंहितेचा भंग केला आहे, त्यामुळे एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या सर्वांची उमेदवारी रद्द करा, अशी मागणी प्रदेश काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांनी केली आहे.

राज्य निवडणूक अधिकारी यांना पाठवलेल्या पत्रात अतुल लोंढे म्हणतात की, निवडणूक आयोगाच्या पत्र क्र. 437/6/INST/2015-CCS दि 29.12.2015 नुसार, निवडणूक प्रचारासाठी सरकारी आणि सार्वजनिक उपक्रमांच्या मालमत्तांच्या वापरावर बंदी घालण्यात आली आहे, अशा आशयाचे पत्र सर्व राज्यांचे कॅबिनेट सचिव, मुख्य सचिव आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांना उद्देशून पाठवलेले आहे. बंदी असतानाही एसटीच्या अधिकाऱ्यांनी 1000 हून अधिक बसेस शिवसेना उमेदवाराच्या निवडणूक प्रचारासाठी अवैधपणे वापरास परवानगी दिली आहे. एसटी महामंडळाच्या या बसेसवर शिवसेना बॅनर लावून निवडणूक प्रचार करत आहे. या बॅनरवर पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांचे फोटो आणि शिवसेनेचे धनुष्यबाण चिन्ह स्पष्टपणे दाखवण्यात आले आहेत. एसटी महामंडळाच्या अधिकाऱ्यांचे हे कृत्य केवळ आचारसंहितेचे स्पष्ट उल्लंघन करत नाही तर निवडणूक प्रक्रियेच्या निष्पक्षता आणि अखंडतेला बाधा आणणारे आहे. आदर्श आचारसंहितेचा भंग केल्याप्रकरणी एसटी महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांवरही कारवाई करावी, असे अतुल लोंढे यांनी म्हटले आहे.




# निवडणुकीसाठी जिल्हा प्रशासन सज्ज

## मतदान साहित्य घेऊन पोलिंग पार्टी रवाना

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** लोकसभा मतदारसंघाची निवडणूक 19 एप्रिल 2024 रोजी सकाळी 7 ते सायंकाळी 6 या वेळेत होणार आहे. त्यासाठी जिल्हा प्रशासनाने पूर्ण तयारी केली असून चंद्रपूर लोकसभा मतदारसंघात एकूण 18 लक्ष 37 हजार 906 मतदार आहे. यात 9 लक्ष 45 हजार 736 पुरुष मतदार, 8 लक्ष 92 हजार 122 स्त्री मतदार तर 48 इतर मतदार आहेत.

चंद्रपूर लोकसभा मतदारसंघात 70 – राजुरा, 71 – चंद्रपूर, 72 – बल्लारपूर, 75 – वरोरा, 76 – वणी आणि 80 – आर्णि या विधानसभा मतदारसंघाचा समावेश होतो. राजूरा मतदारसंघात 330 मतदान केंद्र, चंद्रपूर मतदारसंघात 383 मतदान केंद्र, बल्लारपूर मतदारसंघात 361 मतदान केंद्र, वरोरा मतदारसंघात 340 मतदान केंद्र, वणी मतदारसंघात 338 मतदान केंद्र तर आर्णि मतदारसंघात 366 मतदान केंद्र असे एकूण 2118 मतदान केंद्र आहेत. या सर्व मतदान केंद्रावर मतदानाचे संपूर्ण साहित्य घेऊन पोलिंग पार्टी रवाना झाल्या आहेत.

उन्हाचा तडाखा लक्षात घेता मतदान केंद्रावर मतदारांकरीता निवारा / प्रतिक्षालय तयार करण्यात आले आहे. तसेच मतदान केंद्रावर गर्दीची परिस्थिती उद्भवून मतदारांना अडचण होणार नाही, याकरीता टोकन सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

जिल्ह्यातील प्रत्येक मतदान केंद्रावर दिव्यांग मतदाराकरीता त्यांच्या मागणीच्या अनुषंगाने व्हीलचेअरची व्यवस्था करण्यात आली आहे.

तसेच प्रत्येक मतदान केंद्रावर जिल्हा प्रशासनाकडून मतदारांच्या मदतीकरीता मदतनीस / स्वयंसेवकाची नियुक्ती करण्यात आली आहे.

# श्रीराम जन्मोत्सवानिमित्त कमल स्पोर्टिंग क्लबच्या वतीने भाविकांना बुंदीचे वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** प्रभु श्रीराम जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त दि. १७ एप्रिल २०२४ रोजी समाधीवार्डातील श्री काळाराम मंदीर येथून श्रीराम मुर्तीची भव्य शोभायात्रा काढण्यात आली. सदर शोभायात्रा मंदीर परिसरापासून ते गांधी चौक जटपुरा गेट-कस्तुरबा रोड मार्गे-गिरनार चौक ते काळाराम मंदीर येथे विसर्जित करण्यात आली. या शोभायात्रेत रथावर विराजमान प्रभु श्रीरामजींच्या मुर्तीचे पुजन, माल्यार्पण व शोभायात्रेचे भव्य स्वागत कमल स्पोर्टींग क्लबचे जिल्हाध्यक्ष युवा नेते रघुवीर अहीर यांनी व उपस्थितांनी केले. दरवर्षीप्रमाणे यंदाही स्पोर्टींग क्लबच्या वतीने रामभक्त व भाविकांसाठी बुंदा वाटप कार्यक्रम रघुवीर अहीर यांच्या प्रमुख मार्गदर्शनात पार पडले. या कार्यक्रमाचा लाभ शेकडो नागरिकांनी घेतला. या कार्यक्रमास महानगराचे माजी उपमहापौर अनिल फुलझेले, माजी नगरसेवक राजेंद्र अडपेवार, भाजपा ओबीसी आघाडीचे प्रदेश सदस्य विनोद शेरकी, राहुल गायकवाड, राजेश वाकोडे, विशाल गिरी, मयुर बोकडे, चेतन शर्मा, अक्षय ठक्कर, सुदामा यादव, प्रविण चुनारकर, अक्षय सोनी, कमल कजलीवाले, राजवीर चौधरी, विपीन मेंढे, कृपेश बडकेलवार, अक्षय चंदनखेडे, प्रज्वल गिलबिले यांचेसह कमल स्पोर्टींग क्लबचे सदस्य उपस्थित होते.



# दीपिका चिखलीया यांनी घेतले साईचे दर्शन

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** रामायण मालिकेतील सीता मातेची भूमिका करून जगभर प्रसिद्ध झालेल्या अभिनेत्री दीपिका चिखलिया यांनी साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेऊंन अनेक आठवणी नुकताच उजाळा दिला साईंच्या दर्शनामुळे मनाला मोठी मनशांती मिळते असे सांगत आपल्या बालपणापासून आपण शिर्डी येथे येत असून लहान असताना समाधी जवळ बसलो होतो ती आठवण कायम असल्याचे सांगत अयोध्येत राम मंदिरात सूर्य तिलक पाहायला मिळाला याबद्दल विचारले असता त्या म्हणाल्या की लोक म्हणतात वैज्ञानिक किमया आहे हे खरे आहे परंतु केलेला हा पहिलाच प्रयत्न यशस्वी ठरला आहे ही गोष्ट खूप महत्त्वाची आहे अयोध्येत साक्षात राम प्रगट झालेच



अनुभव रामभक्त घेत आहे त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर दर्शनासाठी देशभरातून भाविक येत आहे आजही लोक मला सीता म्हणून ओळखतात १९९१ ला मी खासदार होते त्यावेळी देखील भाजपात होते व आजही आहे यावेळी माजी खासदार दीपिका चिखलीया समावेत त्यांची मुलगी कु निधी देखील होती दीपिका यांनी साईबाबांच्या द्वारकामाईत व गुरुस्थानचे दर्शन घेतली जनसंपर्क विभागातील अधिकारी अनिल धरम यांच्याशी बोलताना दीपिका म्हणाले की दर गुरुवारी मी साईबाबांचे चरित्र वाचत असते शिर्डीला रामनवमीच्या दिवशी साहित्य समाधी दर्शन घेऊन मनाला मोठे समाधान मिळाल्याचे त्यांनी सांगितले.

# मराठवाडा ग्रामीण विकास संस्था अंतर्गत एच.आय.व्ही. शिबिर संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळसिंग राजपूत**

**सिल्लोड :** तालुक्यातील बाळापूर येथे दि. 18 रोजी बाळापुर येथे मराठवाडा ग्रामीण विकास संस्था लिंक वर्कर प्रकल्प अंतर्गत एच आय व्ही तपासणी कॅम्प घेण्यात आला हा कॅम्प प्रकल्प संचालक आप्पासाहेब उगले पाटील प्रकल्प संचालक यांच्या मार्गदर्शन खाली घेण्यात आला.

या कॅम्पमध्ये एकुण 50. लोकांची एच आय व्ही तपासणी करण्यात आली. यावेळी कॅम्प मध्ये लोकांना एच आय व्ही विषयी सविस्तर माहिती अरुण चव्हाण देशमुख लिंक वर्कर यांनी दिली व लोकांची एच आय व्ही तपासणी महेंद्र पाटील प्रयोग शाळा तंत्रण यांनी केली. यावेळी या कॅम्पमध्ये कॉन्सिलर सुनील वानखेडे यांनी लोकांना एच आय व्ही विषयी सविस्तर माहिती सांगितली.

यावेळी उपस्तित अन्नपूर्णा ढोरे डी आर पी विशाल पडवळ सुपरव्हायझर विनायक कल्याणकर सरपंच बाळापूर जयराज चव्हाण पत्रकार दैनिक पुण्य नगरी गणेश पाटील कोलते पत्रकार पुढारी साधना दांडगे अंगणवाडी सेविका ज्योती कल्याणकर अंगणवाडी सेविका मनीषा दांडगे अंगणवाडी मदतनीस व गावातील महिला व पुरुष उपस्तित होते, अशी माहिती अरुण चव्हाण यांनी बोलताना दिली.



# उदयनराजेंचे साताऱ्यात जोरदार शक्तिप्रदर्शन

आधुनिक केसरी न्यूज

**वाई :** उदयनराजें उद्या गुरूवारी मुख्यमंत्री दोन्ही उपमुख्यमंत्र्यांसह साताऱ्यात जोरदार शक्ती प्रदर्शन करत आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. भारतीय जनता पार्टीचे उमेदवार म्हणून उदयनराजे भोसले यांची लोकसभेची उमेदवारी निश्चित झाली आहे. उदयनराजे भोसले गुरुवारी आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार असल्यामुळे महायुतीचे सातारा शहरात उद्या जोरदार शक्ती प्रदर्शन होणार आहे.

या शक्ती प्रदर्शनात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री अजित पवार हे तिन्ही वरिष्ठ नेते साताऱ्यात येणार असल्याने या रॅलीकडे लक्ष लागून राहिले आहे. साताऱ्यातील महायुतीचे सर्व आमदार आपल्या समर्थकांसह या रॅलीमध्ये सहभागी होणार आहेत. राज्यसभेचे खासदार उदयनराजे भोसले यांनी मीच उमेदवार असे म्हणत आपला प्रचार सुरू केला आहे. भाजपच्या केंद्रीय सुकाणू समितीने उदयनराजे भोसले यांच्या नावाची घोषणा केली. गुरुवारी उदयनराजे उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत.

# ईडीचा गंभीर आरोप

आधुनिक केसरी

देशात लोकसभा निवडणुकांचे रणशिंग फुंकले असून आम आदमी पार्टीही मैदानात उतरली आहे. मात्र, आपचे प्रमुख अरविंद केजरीवाल यांच्याशिवाय पक्षाला निवडणुकीत प्रचार करावा लागत आहे. राजधानी दिल्लीतील बहुचर्चित दारू घोटाळ्याप्रकरणात अंमलबजावणी संचालनालयाने त्यांना अटक केली आहे. सध्या ते तिहार येथील तुरुंगात न्यायालयीन कोठडीत आहेत. या दरम्यान दिल्लीतील राऊज एव्हेन्यू कोर्टात केजरीवाल यांच्या याचिकेवरील सुनावणीदरम्यान ईडीने मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. विशेष म्हणजे न्यायालयाकडून जामीन मिळवण्यासाठी केजरीवाल यांच्याकडून हा खटाटोप केला जात असल्याचेही ईडीने म्हटले. अरविंद केजरीवाल तुरुंगात मिठाई, आंबे आणि साखर खात आहेत. स्वतःची साखर वाढवून जामीन मिळवण्याचा केजरीवाल यांचा प्रयत्न असल्याचे ईडीने न्यायालयात म्हटले आहे. ईडीच्या आरोपानंतर दिल्ली कोर्टाने तिहार तुरुंग प्रशासनाकडून केजरीवाल यांचा डाएट चार्ट मागवला आहे. केजरीवाल यांना टाईप 2 डायबेटीज आहे, तरीही ते तुरुंगात बटाटा, आंबे आणि मिठाई खात आहेत. केजरीवाल जाणीवपूर्वक गोड पदार्थांचे सेवन करत आहे. कारण, या सेवनामुळे त्यांची साखर वाढीस जाऊन, वैद्यकीय कारणास्तव त्यांना जामीन मिळण्यास मदत होईल, असा दावा ईडीने न्यायालयात केला आहे. केजरीवाल यांना न्यायालयाने घरातील जेवण देण्यास परवानगी दिली आहे. मात्र, तुरुंग प्रशासनाने आम्हाला केजरीवाल यांचा डाएट प्लॅन दिला आहे. त्यामध्ये, केजरीवाल काय-काय खातात याची माहिती आहे. त्यानुसार, आंबे, बटाटे आणि गरजेपेक्षा जास्त मिठाई खात आहेत, असेही ईडीने न्यायालयात सांगितले आहे. त्यावर, न्यायालयाने तुरुंग प्रशासनाकडून केजरीवाल यांचा डाएट चार्ट मागवला आहे. याप्रकरणी पुढील सुनावणी शुक्रवारी होणार आहे. अरविंद केजरीवाल यांनी त्यांच्या पत्नीमार्फत आपच्या कार्यकर्त्यांसाठी खास संदेश पाठवला आहे. "तुम्हा सर्वांना मी नमस्कार करतो. मी आज तुम्हाला मलाच वोट करा असं सांगत नाही. आगामी निवडणुकीत तुम्हाला कोणाला पराभूत करण्यासाठी किंवा विजयी करण्यासाठी आवाहनही करत नाही. मी 140 कोटी देशवासीयांना भारतासाठी सहयोग देण्याची आवाहन करत आहे. नवा भारत बनवण्यासाठी मी तुम्हाला आमंत्रित करत आहे. भारत महान देश आहे. आपली संस्कृती फार काळ पूर्वीची आहे. तरीही आपल्या देशात लोक अशिक्षित का आहेत? गरिब का आहेत? असा सवाल केजरीवाल यांनी तुरुंगातून पाठवलेल्या संदेशातून केला आहे. दिल्लीतील महाविकास आघाडीच्या सभेतून काँग्रेससह इंडिया आघाडीतील सर्व पक्षांनी दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या अटकेबाबत निषेध व्यक्त केला होता. दरम्यान, या सभेत काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांनी केजरीवाल यांच्या पत्नी सुनिता केजरीवाल यांना आधार देत विचारपूस केली. इंडिया आघाडीच्या या सभेला काँग्रेस नेते राहुल गांधी, एनसीपी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार, बिहारचे विरोधी पक्षनेते तेजस्वी यादव, पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान, ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्यासह अनेक नेते उपस्थित होते.

# आस्था का बाजार



कॉ. के.के. जांबकर
मो. 9422870578

आधुनिक केसरी

**मागच्या महीन्यात मी कुटूंबासोबत ऐतिहासीक-धार्मीक व निसर्ग भ्रमंतीसाठी मध्यप्रदेश व उत्तर प्रदेश प्रवासात होतो. प्रवासाची सुरुवात नांदेड-नागपूर-अमरकंटक-खजुराहो-आयोध्या-प्रयागराज-चित्रकुट-जबलपुर-भेडाधाट अशी झाली. नर्मदेचे उगमस्थान असलेले अमरकंटक येथे मुक्काम पडला. अतिशय निसर्गरम्य वातावरणात विंद्याचल पर्वताच्या रांगात वसलेले व नर्मदेचे उगमस्थान असलेले अमरकंटक खूपच नयनरम्य स्थान आहे. तेथील लोकही आदिवासी पाड्यातील असल्यामूळे साधे-भोळे व सरळ मनाचे भावले.**









भव्य मोठ्या गुरुद्वाऱ्यात आमची राहण्याची सोय झाली. जागोजागी स्नान व सौंदर्यप्रसाधनाची व्यवस्था, गांव तसे फारसे मोठे नाही पण "क" वर्ग नगरपालीका असलीतरीही सर्वत्र निटनेटकेपणा दिसुन आला. एक रात्र मुक्काम करुन निसर्गाचा मनमुराद आनंद लुटून जगप्रसिद्ध असलेल्या खजुराहोला आलोत. रस्त्यात गावाजवळ चहाची हुक्की आल्यामूळे तेथे ट्रॅफिकचे लोक थांबले होते. त्यांना परिचय करून दिल्यानंतर सृजनसिंग नामक ट्रॅफिक हवालदाराने जवळच असलेल्या अतिशय आरामदायी निर्वाणा हॉटेलात आमच्या चौघांची केवळ १२००/- रुपयात राहण्याची सोय केली. अतिशय प्रेमळ व सहकार्याची भावना ठेवून राहणारे सर्वच लोक आम्हास भेटले. कुठेच कसलीही आडचण आली नाही. १२ व्या शतकातील जगप्रसिद्ध लेण्या व मंदिर बघून आवश्यक तेथे फोटोसेशन झाले. दुसऱ्या दिवशी भोपाळ-इंदोरकडे वाटचाल करण्यापूर्वी आमच्या सुविद्य सहचारीनीला योगायोगाने रस्त्यावरील आयोध्या ४०० कि.मी. चा फलक दिसला गाडी थांबवली. विचारपुस केली असता तेथून आयोध्या जवळच असल्याने आपापसात चर्चा करून आयोध्येला जाण्याचा बेत ठरला. शेवटी राजहट्ट-बालहट्ट व स्त्रीहट्ट म्हणण्या ऐवजी पत्नी हट्टपुर्ण करावाच लागला. रस्त्यात एका ठिकाणी मुक्काम करुन दुसरे दिवशी सायंकाळी चारच्या आसपास आयोध्येला पोहचलो. आयोध्या गांव तसे फारसे मोठे नाही पण भाजपाच्या वचनपूर्तीतला एक महत्त्वाचा दुवा असल्यामूळे आज जागतीक स्तरावर त्याला आगळे वेगळे महत्व आहे. प्रभूरामचंद्र हे समग्र भारतवासीयांच्या आस्थेचे प्रतिक म्हणून आज पुनःश्च जगाच्या नकाशावर त्याची ओळख निर्माण झाली आहे. नुकतेच भारताचे लोकप्रिय पंतप्रधान मा. नरेंद्रजी मोदी यांनी २२ जानेवारी २०२४ रोजी अथक परिश्रम व प्रयत्नांतून भारतीयांच्या आस्था-विश्वासाचे प्रतिक असणारे हे भव्यदिव्य शिल्प जनतेला समर्पित केले. ७० टक्के भारतीयां सोबत जगातील इतर हिंदूराष्ट्रानाही ते अतिशय भावले. ही वास्तू व असपासचा परिसर तुर्तास म्हणावा असा विकससित झालेला नाही. अजुन बरेच काम शिल्लक असल्यामूळे व पुरेशा सुविधा उपलब्ध नसल्यामूळे येथे श्रद्धाळु यात्रेकरूंची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होते. विशेषतः येथे यात्रेकरुंसाठी राहण्यायोग्य म्हणजे तिरूपती टाईप व्यवस्था नसल्यामूळे व स्थानिक प्रशासनाचे काटेकोर नियोजन व नियंत्रण नसल्यामूळे स्थानिकांकडून वरेमाप पैसे वसूल होतात. ज्यात यात्रेकरूसह श्रद्धाळूंचा हिरमोड होतो. येथील स्थानिक नागरिक रोजी-रोटी साठी आटापिटा करून यात्रेकरूला घेरत असतात. वास्तविक पाहता बेरोजगारी व अल्प उत्पन्न गटातील हे रोजीरोटी साठी हे सर्व करतात पण कात्री तर यात्रेकरूच्या खिशाला लागते ना ! एकंदरीत तेथील सर्व वातावरण पहाता मंदिर अतिशय अप्रतिम कलाकृती आहे. उत्तरप्रदेश शासन अथवा केंद्र सरकारने या जागेचे जाज्वल्य व महत्त्व कायम जपायचे असेल तर तिरूपती धर्तीवर याचा विकास करणे गरजे वाटते. जेणे करून उत्तम पर्यटनस्थळ व भारतीयांच्या अंतःर्ममनाचा ठाव घेणारे प्रभुरामचंद्राचे हे ठिकाण अप्रतिमच असायला हवे. सर्वार्थाने पर्यटनस्थळ म्हणून विकसीत केले तर बेरोजगारी बऱ्याच प्रमाणात कमी होण्यास मदत होईल. एकंदरीत येथिल वास्तव अनुभवता सध्यातरी येथे आस्था कमी व बाजारच जास्त दिसतो. आस्था म्हणजे विश्वास व बाजार म्हणजे खरेदी विक्रीचे ठिकाण असे मला वाटते. प्राप्त परिस्थितीत येथे मात्र मला आस्थेचा बाजारच जाणवला जो आस्थेशी समरूप झालेला दिसतो. लोक वाट्टेल ते करून आस्थेला बाजार बनवतात. आस्था ही आस्थाच असली पाहिजे त्याचा बाजार होता कामा नये अन्यथा जनता प्रभुरामचंद्राच्या आस्थेला विसरून त्याचा बाजार करतील. एकंदरीत आम्ही सर्वांनी वर्तमानातील आयोध्या बघीतली खूप चांगले प्रसन्न वाटले. जवळच तेथून प्रयागराज, चित्रकुट, भरतभेट वगैरे ठिकाणे बघून जबलपूर मार्गे भेडाघाटला मुक्कामाला थांबलो. अतिशय निसर्गरम्य ठिकाण, विविध प्रकाराचे मार्बलचे दगड, तेथील अप्रतिम कोरीव कलाकृती, नर्मदेचे खळखळणारे विस्तिर्ण पात्र, खरोखरीच निसर्गाचे अद्वितीय लेणे, जागा सोडता सोडवेणा. शेवटी १०-१२ दिवसाच्या सततच्या प्रवासानंतर घरची ओढ निर्माण झाली. एकंदरीतच विंद्याचलाच्या कुशीतील आपल्या मध्यप्रदेशांतील सज्जन लोक, राहणे खाण्या-पिण्याची मनपसंद व्यवस्था, आदिवासी पाड्यातील गोरगरीब प्रेमळ जनता बघून मध्यप्रदेश सोडवेनासे झाले. लेकीन वापस तो होना है प्रमाणे आपलं घर गाठलं. कुटुंबासह सर्व प्रवास सुखरूप व आनंददायी झाला. विशेषतः मुलाने आम्हांस बायरोड व्यवस्थितत नेले व आणले हीच आमची मोठी जमेचे बाजू. प्रत्येकाने वेळात वेळ काढून आपल्या कुटुंबासह अशा सहली जरूर कराव्यात, जेणेकरून विविधतेने नटलेला आपला भारत किती सुंदर आहे याची जाणीव झाल्याशिवाय राहणार नाही. शेवटी जय श्रीराम... लागु दे काम... मिळू दें दाम... सध्यातरी असे म्हणणे वावगे नसावे.

# शक्ती हेच सामर्थ्य असल्याने ते अर्जित करता आलं पाहिजे



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**शक्ति हेच सामर्थ्य आहे आणि हेच सामर्थ्य अर्जित करता आलं पाहिजे तरच जीवन उत्कर्ष होतो. कार्य हाच आपला परिचय असतो अन्यथा एका नावाने अनेक लोक वावरत असतात. आपण उपभोग वस्तू होता कामा नये एवढ अस्तित्व या सृष्टीवर आपलं नक्कीच असलं पाहिजे. स्वतःच अस्तित्व निर्माण करणं हा अंहकार नाही आत्मसन्मान आहे. स्वतःचा आत्मसन्मान स्वतः निर्माण केला पाहिजे वाढवला पाहिजे तो संभाळून टिकवला देखिल पाहिजे.जन्माला येतानाच कोणी गरिब अथवा श्रीमंत म्हणून अथवा राजा, कोणी प्रधान म्हणून जन्मला येत नाही. अपवादात्मक परिस्थितीत एखाद्या व्यक्ति राजघराण्यात अथवा वडिलोपार्जित श्रीमंत म्हणून जन्माला येऊ शकतो पण वेगवेगळ्या पदव्या, अथवा विविध क्षेत्रातील दिग्गज म्हणून जन्माला येता येत नाही.**

आपल्या मध्ये असणारी गुण कौशल्य,गुणवत्ता हि वेळेनुसार सिद्ध करावी लागते.जेणेकरून वेळेवर आपलं प्रभुत्व निर्माण होईल आणि आपण यशस्वी होऊन त्या क्षेत्रातील दिग्गज म्हणून पुढे येऊ पण आपण जर काहिच प्रयत्न केले नाही आपली गुणवत्ता सिद्ध केली नाही अथवा आपल कौशल्य विकसित केले नाही तर मग मात्र आपल्याला परावलंबी राहव लागेल.मुळात जन्माला येताना प्रत्येक व्यक्ती आपलं पुर्व संचित घेऊन येतो व आपल्या कर्मा नुसार गुण कौशल्य विकसित करत साधनं संपत्ती अर्जित करतो. याच दरम्यान स्वतःच बळ सामर्थ्य पण वाढवतो. मुळात हेच बळ सगळ्यांन मध्ये सारखंच आहे.पण जो प्रयत्न करतो तो यशस्वी होतो.निसर्गाच्या रचनेत जन्माला आलेला प्रत्येक व्यक्ती शक्तिवान बलावान सामर्थ्यशाली आहे.हे विसरून चालणार नाही. जन्मताच आपल्या मध्ये असणार बळ शक्ति सामर्थ्य आपण वेळ काळ आणि परस्थिती नुसार किती प्रमाणात विकसित करू शकतो त्यानुसारच आपल मुल्यमापन ठरत . सगळ्याच क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत बळ शक्ति अर्जित करणारा व्यक्ति प्रभावशाली ठरतो . मुळात प्रभाव हा आपण आपलं बळ किती विकसित केले यांवरच अंतिमतः ठरतो. आणि ज्याला आपलं बळ विकसीत करता आलं नाही.किंबहुना बळ विकसित करण्यासाठी प्रयत्न सुद्धा केला नाही तो इतरांच्या साठी उपभोग वस्तू ठरतो.आपला उपभोग वस्तू म्हणून वापर होऊ देयचा नसेल तर आपलं बळ शक्ति सामर्थ्य आपण विकसीत केले पाहिजे.बल हिन व्यक्तीचा लोक उपभोग वस्तू समजुन वापर करतात.स्वतःची ताकद अस्तित्व निर्माण करा मग ते अस्तित्व छोट असेल अथवा मोठं असेल कसही असेल पण ते स्वतःच असलं तरच आपलं भविष्य सुरक्षित उज्वल आहे. क्षेत्र कोणत आहे याला फार महत्त्व नाही.आपण जिथे आहोत अथवा ज्या परिसरात ज्या कार्य क्षेत्रात आपणं आहोत.तिथं आपलं महत्व सहजासहजी कोणीही मान्य करणार नाही.आपली मेहनत धडपड प्रचंड कष्ट दैदिप्यमान इच्छा शक्ति चिकाटी जिद्द आणि वारंवार प्रयत्न या मधुन जेव्हा आपण यशोशिखरावर गाठु तेव्हा आपलं एक वेगळं वलय निर्माण होईल. अस्तित्व निर्माण होईल हेच वलय अस्तित्व समाजाच्या पातळीवर पटलावर आपल बळ सिद्ध करणार ठरेल.आपण एकदा आपलं बळ शक्ति सामर्थ्य अर्जित केल तर आपले अनेक प्रश्न आपोआप मिटतात संपुष्टात येतात.पण आपलं बळ शक्ति सामर्थ्य आपल्याला यदाकदाचित विकसीत करता आलं नाही तर मग मात्र आपल्याला आपल्या प्रत्येक अडचणीच्या अनुषंगाने अनेकांवर अंवलबुन विसंबून राहव लागत आणि अंवलबुन राहुन आपल्या दैनंदिन अडचणी सुटतीलच हे पण निश्चित नाही. आपण आपल्या दैनंदिन अडचणीच्या अनुषंगाने ज्यांच्या वर अंवलंबित आहेत ते आपला उपभोग वस्तू म्हणून वापर करतील या मध्ये किंतु परंतु शंका नाही याच दरम्यान आपल्याला अपमान जनक परस्थितीला देखील सामोरे जावे लागू शकते. आपली इच्छा असो वा नसो हे सगळं आपल्याला सहन पण करवा लागेल.आपल्या उत्कर्ष साठी आपल्या कडे आपलं बळ विकसित करण्या पलिकडे दुसरा कोणताही पर्याय नाही.आपल बळ शक्ति सामर्थ्य विकसीत केल पाहिजे.कोणत्याही बाबतीत कोणावरही अवलंबून राहता कामा नये.आत्म बल विकसित करून सामर्थ्यशाली व्हा आपला आदर्श इतरांनी घ्यावा असं व्यक्तिमत्त्व स्वतःला घडवा.तरच जीवन हित होईल अन्यथा आपलं जीवन कोणाच्या तरी अखत्यारीतील उपभोग वस्तू ठरेल या मध्ये शंका नाही.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - बाजीराव श्रीराम खांदवे, अहमदनगर कार्यालय - तिसरा मजला, खरेदी विक्री संघाची जुनी इमारत, मार्केट यार्ड, स्टेशन रोड, अहमदनगर ४१४००१, फोन ९८२२१०७६५०. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * Executive Editor - Bajirao Shriram Khandave. Ahmednagar office - third floor, kharedi - vikri sangh old building, Market yard Station Road, Ahmednagar 414001. Phone 9822107650.(* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# श्रीरामभक्त शिवा राजगिरे यांची शहरात झेंडा मिरवणूक

## मिरवणुकीची २१ वर्षांची परंपरा कायम

आधुनिक केसरी न्यूज



**नेवासा :** येथील श्रीराम भक्त शिवा राजगिरे यांची श्रीराम नवमीला काढण्यात येणारी झेंडा व प्रतिमा मिरवणूकीची २१ वर्षाची परंपरा आज ही कायम असून अजून ही  ती जपली परंपरा त्यांच्याकडून जपली जात आहे. रामनवमीच्या निमित्ताने झेंडा व प्रतिमा मिरवणुक काढण्यात आली. रामनवमीच्या निमित्ताने बुधवारी दि.१७ एप्रिल सकाळी एसटीस्टँडपासून झेंडा मिरवणूकीस प्रारंभ करण्यात आला. शिवा राजगिरे यांनी या झेंडा मिरवणूकीचे नेतृत्व केले. सजविण्यात आलेल्या रथात प्रभू रामचंद्र भगवंताची प्रतिमा दर्शनासाठी ठेवण्यात आली होती.

यावेळी नेवासा बाजार समितीचे सभापती नंदकुमार पाटील, शिवसेनेचे युवा नेते धर्म रक्षक बिट्टूभाऊ लष्करे, जेष्ठ पत्रकार गुरुप्रसाद देशपांडे, डॉ.करणसिंह घुले, नेवासा प्रेस क्लबचे अध्यक्ष मोहन गायकवाड, भाजपचे राज्य कार्यकारिणी सदस्य निरंजन डहाळे, सचिन बनसोडे, माजी सरपंच सतीश गायके, नारायण लोखंडे, बंडू आलवणे, जालिंदर गवळी, राजू ढगे, रमेश राजगिरे, कचरू राजगिरे, भैय्या गारुळे, गणेश चांगले, विष्णू जाधव, नीलेश आलवणे, बबलू देशमाने, प्रवीण कळमकर, अनिल सोनवणे, संतोष भागवत, अंकुश पंडूरे, रोहित डोमकावळे, बाळासाहेब शिंदे यांच्यासह रिक्षा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी पुष्पहार घालून पूजन केले. सदर मिरवणुकीच्या अग्रभागी प्रवरासंगम येथील मुबारक तांबोळी यांच्या बँड पथकाने व पथकातील गायकाने भक्तीगीते गाऊन उपस्थितांना आकर्षित केले. सदरच्या झेंडा व प्रतिमा मिरवणूकीचे चौकाचौकात फटाक्यांची आतषबाजी करत व तोफांची सलामी देत स्वागत करण्यात आले तर मुख्य पेठेत सुवासिनींनी पंचारती ओवाळून प्रभू रामचंद्राच्या मूर्तीचे औक्षण केले. सदरची मिरवणूक खोलेश्वर गणपती मंदिर चौक,  नगरपंचायत चौक,डॉ.हेडगेवार चौक,मारुती चौक मार्गे जुन्या पेठेतून श्रीराम मंदिरात गेली यावेळी जय श्रीराम असा जयघोष करत मंदिरावर झेंडा चढविण्यात आला.



# श्रीराम नवमीच्या शुभमुहूर्तावर पाणपोईचे उद्घाटन; 'श्रीं'च्या सेवेकऱ्यांचा उपक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीक्षेत्र राजूर :** उन्हाळ्यामध्ये वाटसरू,ग्रामीण भागातून कामानिमित्त शहरात आलेले नागरिक, कामगार, मजूर, व्यवसायानिमित्त भटकंती करणारे फिरस्ती, प्रवासी, ग्राहक आणि शाळेतील विद्यार्थ्यांची पिण्याच्या पाण्याची गैरसोय होवू नये म्हणून राजूर येथील श्रीच्या सेवेकरींनी श्रीराम नवमीच्या शुभ मुहूर्तावर लोकसेवा हेअर सलूनच्या समोर लिंबाच्या झाडाखाली पाणपोईची सुरवात सुरू केली आहे.
भारतीय सैन्यदलात जम्मू-काश्मीरमध्ये कार्यरत असलेले जवान रामेश्वर साबळे यांच्याहस्ते या पाणपोईचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी देशसेवेचे कर्तव्य बजाणारे रामेश्वर साबळे आणि ज्यांच्या मुलाची अमेरिकेत कॅलिफोर्निया उच्च पदावर निवड झाली असे गोरखनाथ जाधव यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी गणपती संस्थानचे अधीक्षक प्रशांत दानवे, गणपती संस्थानचे विश्वस्त गणेशराव साबळे, गोरखनाथ जाधव, बांधकाम व्यावसायिक भीमाशंकर दारुवाले, विनोद पांडे, प्रा. आसाराम बोटूळे, प्रा.बाळासाहेब बोराडे, डॉ. ईश्वर जटाळे, सेवा व्यवस्थापक उत्तम रावळकर, दिलीप पुंगळे, हरी निकम मनोज अग्रवाल, सचिन ढाकणे, सतीश आंबरे, आर. एच. दानवे, मोरे सर, पांडुरंग इंगळे, अनिल तुरेराव, अर्जुन पंडित, अजिनाथ कानडे, आदित्य पुंगळे, विष्णू दशमुखे, दत्ता सोनवणे, योगेश कुमकर, ज्ञानेश्वर पडोळ, अभिषेक कळंबे यांच्यासह श्रीचे सेवेकरी आणि मित्र परिवार उपस्थित होते.

# सोयगाव परिसरात सुटीच्या दिवशी तळीरामांना देशी-विदेशी दारू मिळते कशी?

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळसिंग राजपूत**

**सोयगाव :** तालुक्यातील सोयगाव पोलीस स्टेशन अंतर्गत जरंडी, निंबायती, बहुलखेडा येथे अवैद्य देशीदारू व गावठी दारूच्या सुरू असलेल्या अवैध धंद्यांविरोधात स्थानिक पोलीस प्रशासन कारवाही करीत नसल्याने दिवसेंदिवस वाढ होत आहे. सोयगाव तालुक्यातील जरंडी, निंबायती, बहुलखेडा परिसरात अवैध देशी दारू व गावठी दारू कोणाच्या आशीर्वादाने सर्रास सुरु आहे मात्र गुलदस्त्यातच आहे. यामुळे अनेक गोरगरीबांचे संसार रस्त्यावर आले आहे. तर तरुण वर्ग आर्थिक, मानसिक त्रासामुळे व्यसनाधितेकडे वळला असून तरुण पिढीच आयुष्य धोक्यात आले आहे. विद्यार्थीवर्ग देखील गुटख्याच्या आहारी गेला आहे. बनोटी दूरक्षेत्र अंतर्गत अवैद्य रित्या देशी, विदेशी दारू सह गावठी दारू विक्री मोठ्या प्रमाणात चालू आहे. तसेच सोयगाव पोलीस ठाणे अंतर्गत येणाऱ्या जरंडी, निंबायती, बहुलखेडा हद्दीतील अवैध देशीदारू, गावठी दारू चालकांवर पोलीस प्रशासनाचे आर्थिक संबंध असल्यामुळे कारवाई होत नाही.
या तिघही गावातील धार्मिक स्थळे, प्राथमिक शाळा परिसर, व मुख्य रस्त्यावर खुलेआम अवैध देशीदारू व गावठी दारू व्यवसाय राजेरोसपणे सुरु असल्याने शेतात काम करण्यासाठी जाणाऱ्या महिलांना तळीरामांचा त्रास



सहन करावा लागत आहे. जरंडी एकाच गावात सहा ते सात ठिकाणी अवैद्य दारू विक्री होत आहे. तर लहान मुलांवर दुषपरिनाम होत आहे. छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलीस अधिक्षक यांनी लक्ष द्यावे अशी मागणी परिसरातून होत आहे. ग्रामीण भागातील महिलांना होणाऱ्या त्रासाकडे लक्ष देऊन जरंडी, निंबायती, बहुलखेडा या ठिकाणी होत असलेली अवैद्य देशीदारू व गावठी दारू बंद करण्यासाठी स्थानिक पोलीस प्रशासनास कारवाई करण्यासंदर्भात सूचना करण्याची मागणी जोर धरत आहे.
ड्राय-डे असो कि सणवार, अवैद्य दारू विक्री सरूच शासनाने जरी ड्राय-डे असो की सणवार तरीही शासनाच्या आदेशाला पायंदळी तुडवत काही आर्थीक संबंधांमुळे तळीरामना देशीदारू व गावठी दारूची जरंडी, निंबायती बहुलखेडा परिसरासह तालुक्यात मोठ्या प्रमाणात विक्री होत असल्याने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत आहे. दि. १७/४/२४ बुधवार रोजी ड्राय डे असल्याने शासनमान्य दुकानात ७५ रुपये किमत असलेली दारू बॉटल ८० ते ९० रुपयाला तर अवैद्य विक्री करणाऱ्यांकडे १०० ते ११० रुपयाला तालुक्यात मोठ्या प्रमाणात विक्री होताना दिसून आले. सोयगाव शहरात तहसील कार्यालयाच्या समोर तर छत्रपती शिवाजी महाराज चौकाच्या हाक्केच्या अंतरावर शासनमान्य दुकानातून ड्राय - डे च्या दिवशी सुध्दा दुकाने चालू ठेवून चढ्या भावाने विक्री केली जात होती.
मुख्य रस्त्यालगत असतांना राज्य उत्पादन शुल्क विभाग व पोलीस प्रशासन अर्थपूर्ण संबंधामुळे निद्रावस्थेत गेल्याचे दिसून येत होते.

# मुंबईसह ठाण्यात पावसाच्या हलक्या सरींची शक्यता; तापमानात घट

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** मुंबईसह ठाणे जिल्ह्यात बुधवारी तापमानात घट झाल्याने काहीसा दिलासा मिळाला आहे.
मात्र, हवेतील आर्द्रतेचे प्रमाण अधिक असल्यामुळे नागरिक उकाड्याने हैराण झाले आहेत. दरम्यान, मुंबई आणि ठाणे जिल्ह्यात आज पावसाच्या हलक्या सरींची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे. तसेच तापमान ३४ ते ३५ अंश सेल्सिअसदरम्यान असेल. मात्र हवेतील उष्मा कायम राहील, असाही अंदाज वर्तविण्यात आला आहे.
गेले दोन दिवस कडक ऊन आणि उष्म्यामुळे मुंबईकर हैराण झाले होते. तापमानाचा पारा बुधवारी कमी झाल्याने मुंबईकरांना काहीसा दिलासा मिळाला. दरम्यान, आज आणि उद्या तापमानात घट झाली तरी हवेतील उष्मा कायम राहण्याची शक्यता आहे, असा अंदाज हवामान खात्याने वर्तविला आहे. आर्द्रता अधिक असल्यामुळे मुंबईकरांना बुधवारी उष्मा सहन करावा लागला. मात्र, दुपारपर्यंत ढगाळ वातावरण असल्यामुळे उन्हाचा तडाखा कमी जाणवला. दरम्यान, आज मुंबई, ठाणे जिल्ह्यांसह सिंधुदुर्गमध्येही पावसाच्या हलक्या सरींची शक्यता वर्तवण्यात आली आहे. तसेच रत्नागिरी आणि रायगड जिल्ह्यात वातावरणात अधिक आर्द्रता जाणवेल.



# श्रीराम नवमी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**मौजे ताडपिंपळगाव :** येथे 17 एप्रिल रोजी श्रीराम नवमी उत्सव खूप मोठ्या उत्साहात पार पडला. सलग 3 रे वर्ष देखील मोठ्या उत्साहात पुरुष आणि महिलांचा सहभाग जास्त प्रमाणात होता आणि याशिवाय आजूबाजूच्या परिसरातील लोकांनी खूप मोठ्या संख्येने कार्यक्रमाला हजेरी लावली होती. या श्रीराम नवमी उत्साहात भव्य अशी रथयात्रा व मिरवणूक काढण्यात आली होती आणि या रथयात्रा मध्ये प्रभू श्रीराम, सीता लक्ष्मण आणि हनुमान यांचा देखावा करण्यात आला होता. हा देखावा बघण्यासाठी सर्व गावकरी मंडळी व युवा वर्ग व महिलांचा जास्त प्रमाणात सहभाग होता. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यामध्ये सर्वात मोठी श्रीराम नवमी उत्सव या गावामध्ये केला जातो. या कार्यक्रमांचे आयोजक हिंदवी स्वराज्य ग्रुप ताडपिंपळगाव सर्कल या ग्रुपतर्फे केले जाते.



# 'लुक ईस्ट' धोरणामुळे ईशान्येकडील राज्यांचा विकास : मोदी

आधुनिक केसरी न्यूज

**आगरतळा :** भारतीय जनता पार्टीच्या सरकारने गेल्या दहा वर्षांत ईशान्येकडील राज्यांच्या विकासावर पूर्ण लक्ष केंद्रित केले असून आता संपूर्ण देश भाजपाच्या लुक ईस्ट धोरणानुसार पुढे जात आहे. काँग्रेस-इंडी आघाडीचे 'लूट ईस्ट' धोरण थांबवून मोदी सरकारने अवलंबिलेल्या लुक ईस्ट धोरणातून ईशान्येकडील राज्यात विकास आणि लोककल्याणाची असंख्य कामे होत आहेत. समृद्ध भारताच्या भाजपाच्या संकल्पात ईशान्येकडील राज्यांच्या विकासाचा मोठा वाटा असेल, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुधवारी त्रिपुरातील आगरतळा येथे झालेल्या प्रचंड जाहीर सभेत बोलताना केले.

काँग्रेस आणि इंडी आघाडीतील राजकीय पक्षांनी ईशान्येकडील राज्यांसंदर्भात नेहमीच संधिसाधू भूमिका घेतली असून यामुळेच या भागाचा विकास रखडला, असेही मोदी म्हणाले. पूर्वी राजकीय पक्षांना केवळ मतांच्या राजकारणापुरतीच ईशान्य भारताची आठवण यायची, काँग्रेस व इंडी आघाडीतील पक्षांनी ईशान्येसाठी केवळ लुटीचेच धोरण अवलंबिले, पण दहा वर्षांपूर्वी भाजपा सरकार सत्तेवर आल्यावर 'लूट ईस्ट' धोरण थांबवून आम्ही 'लुक ईस्ट धोरण' अवलंबिले, आणि विकासाची वाटचाल सुरू झाली असा दावा मोदी यांनी केला. ही वाटचाल अखंड सुरू रहावी यासाठी आगामी लोकसभा निवडणुकीत काँग्रेस वा मार्क्सवादी कम्युनिस्ट सारख्या संधिसाधू पक्षांना संधी न देता भाजपाला मोठ्या मतांनी विजयी करा, असे आवाहन पंतप्रधानांनी केले. मी असा पहिला पंतप्रधान आहे, ज्याने गेल्या 10 वर्षांत 50 हून अधिक वेळा ईशान्येला भेट दिली आहे, काँग्रेस सरकारमधील अनेक मंत्र्यांना तर त्रिपुरा भारताच्या नकाशावर कुठे आहे हे देखील माहित नव्हते, असा टोला मोदी यांनी लगावला. संधिसाधू इंडी आघाडीचे भ्रष्टाचाराचे दुकान वाचवण्यासाठी काँग्रेस आणि कम्युनिस्ट पक्ष एकत्र आले आहेत. याच संधिसाधूपणामुळे ते त्रिपुरामध्ये ते एकत्र लढत आहेत पण केरळमध्ये ते एकमेकांविरोधात लढत आहेत. तिकडे केरळमध्ये काँग्रेस कम्युनिस्टांना दहशतवादी म्हणते आणि कम्युनिस्ट काँग्रेसला भ्रष्ट म्हणतात, अशा शब्दांत त्यांनी इंडी आघाडीच्या राजकारणाची खिल्ली उडविली. भाजपा सरकारने गेल्या दशकात त्रिपुराच्या विकासासाठी जे काही केले तो तर केवळ ट्रेलर आहे, ईशान्येला अजून बरेच पुढे जायचे असून विकासाचा मोठा पल्ला गाठायचा आहे. पुढील पाच वर्षांसाठी भाजपाने सादर केलेले संकल्पपत्र त्रिपुरातील जनतेसाठी विकासाची नवी दारे उघडणार आहे, अशी ग्वाही देखील त्यांनी दिली.

मोदी सरकार सत्तेवर येण्यापूर्वी त्रिपुरातील जनता जीवनाच्या मूलभूत गरजांपासून वंचित होती. मार्क्सवादी कम्युनिस्ट सरकारने त्रिपुरामध्ये पीएम आवास योजना खंडित करण्याचा प्रयत्न केला, परंतु भारतीय जनता पार्टीच्या सर्वतोपरी प्रयत्नांनी राज्यात साडेतीन लाखांहून अधिक पक्की घरे बांधली आहेत. येत्या पाच वर्षांत देशात तीन कोटी नवीन घरे बांधली जातील, व या योजनेचा मोठा लाभ त्रिपुरातील जनतेला मिळेल, असा संकल्प भाजपा ने केला आहे. देशातील प्रत्येक लाभार्थ्याला पाच वर्षे मोफत रेशन मिळत राहील, जेणेकरून एकही गरीब मुलगा उपाशी राहणार नाही, ही मोदींची हमी आहे. भारतीय जनता पार्टीने आपल्या संकल्प पत्रात आयुष्मान योजनेंतर्गत 70 वर्षांवरील प्रत्येक व्यक्तीला पाच लाख रुपयांपर्यंत मोफत उपचार देण्याचा शब्द दिला आहे, असे पंतप्रधानांनी सांगितले. भारतीय जनता पार्टीचे सरकार हायवे, इंटरनेट, रेल्वे, एअरवेजच्या माध्यमातून ईशान्येच्या विकासासाठी पुढे जात आहे. आज त्रिपुरामध्ये तीन हजार कोटी रुपये खर्चून चार पदरी महामार्गाचे काम सुरू आहे. पश्चिम आगरतळा बायपासचे कामही येत्या दोन-तीन वर्षांत पूर्ण करण्याचे लक्ष्य आहे. त्रिपुराला बांगलादेशाला जोडण्यासाठी काही वर्षांपूर्वी मैत्री सेतू सुरू करण्यात आला होता. एकेकाळी त्रिपुरामध्ये मोबाईल सिग्नलही उपलब्ध नव्हते, आज फाईव्ह-जी सेवा विस्तारत आहे, असेही ते म्हणाले. काँग्रेसच्या राजवटीत मोबाईल सुविधांच्या किंमती गगनाला भिडत होत्या, मात्र मोदी सरकारने मोबाईल डेटा स्वस्त केल्यामुळे प्रत्येक वर्गातील लोक इंटरनेट वापरत आहेत. कोरोनाच्या काळात गरीब मुलेही मोबाईल आणि इंटरनेट सुविधांद्वारे अभ्यासाशी जोडलेली राहिली. असे पंतप्रधान म्हणाले. त्रिपुरातील रेल्वे वाहतुकीचे जाळे 10 वर्षांत राज्य एक डझनहून अधिक गाड्यांद्वारे जोडले गेले आणि रेल्वे मार्गांच्या विद्युतीकरणाचे काम वेगाने पूर्ण झाले. आगरतळा विमानतळावर नवीन आणि आधुनिक टर्मिनल बांधण्यात आले. त्रिपुराचे भाजपा सरकार एक पाऊल पुढे टाकत आहे आणि राज्याच्या विकासासाठी इरा प्लस मॉडेलवर काम करत आहे, अशी माहितीही त्यांनी दिली.



आपल्या तडाखेबंद भाषणात मोदी यांनी काँग्रेस आणि राहुल गांधी यांच्यावरही हल्ला चढविला. काँग्रेसचे युवराज उत्तर प्रदेशातील निवडणुकीत पराभूत झाल्यानंतर आपली इज्जत वाचवण्यासाठी केरळला पळून गेले होते. केरळच्या मुख्यमंत्र्यांनी काँग्रेसच्या युवराजांविरोधात आवाज उठवला असून त्यावर केरळचे मुख्यमंत्री भ्रष्टाचारात अडकले असून त्यांच्यावर कारवाई करावी, असे विधान काँग्रेसच्या युवराजांनी केले आहे. युवराजांवर कोणी टीका केली, तर त्या व्यक्तीला तुरुंगात टाकावे, अशी काँग्रेसची इच्छा आहे, हेच यावरून स्पष्ट होते असे ते म्हणाले. भ्रष्टाचारात गुंतलेल्या कोणत्याही व्यक्तीला सोडले जाणार नाही, असा भारतीय जनता पार्टीचा संकल्प आहे. भाजपा सरकारने केरळच्या मुख्यमंत्र्यांबद्दल सत्य बाहेर आणल्यावर काँग्रेस गप्प बसते. तपास यंत्रणेने कारवाई सुरू करताच विरोधी पक्ष आक्रमक झाले, हाच काँग्रेसचा खरा चेहरा आहे. भारतीय जनता पार्टीच्या सरकारचा संकल्प भ्रष्टाचार हटवण्याचा आहे, तर दुसरीकडे भ्रष्टाचाऱ्यांना वाचवणे हा इंडी आघाडीचा उद्देश आहे, असे ते म्हणाले.

त्रिपुराचे मुख्यमंत्री श्री.माणिक शाह, भाजपा प्रदेशाध्यक्ष राजीव भट्टाचार्य, त्रिपुरा पूर्व लोकसभा उमेदवार महाराणी कृती सिंह देबबर्मा आणि पश्चिम त्रिपुरा लोकसभा उमेदवार बिप्लब कुमार देब यांच्यासह भाजपाचे अन्य नेते या सभेत मंचावर उपस्थित होते.काँग्रेस आणि कम्युनिस्ट पक्षाला दिलेले प्रत्येक मत व्यर्थ जाईल आणि भाजपाला दिलेले प्रत्येक मत देशातील विकसित भारताचा पाया मजबूत करेल. त्रिपुराच्या समृद्धीसाठी आणि विकासासाठी 19 आणि 26 एप्रिल रोजी भारतीय जनता पक्षाला प्रचंड मतांनी विजयी करा आणि त्रिपुराचे भविष्य निश्चित करा, असे आवाहनही पंतप्रधान मोदी यांनी केले.

# स्वतःच्या व देशाच्या उज्ज्वल भविष्यासाठी निर्भीडपणे मतदान करा : जिल्हाधिकारी

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** प्रत्यक्ष मतदानाची वेळ अगदी जवळ आली असून लोकशाहीच्या



बळकटीकरणासाठी प्रत्येक मत महत्वाचे आहे. शिवाय मतदानातूनच आपण आपले व देशाचे उज्वल भविष्य निश्चित करू शकतो. त्यामुळे मतदारांनो, कोणत्याही आमिषाला बळी न पडता निर्भिडपणे मतदान करून लोकशाही प्रक्रियेत सामील व्हा, असे कळकळीचे आवाहन जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी केले आहे.



जिल्ह्यातील मतदारांच्या नावे संदेशपत्र लिहून जिल्हाधिका-यांनी नागरिकांना मतदानाची टक्केवारी वाढविण्याचे आवाहन सुद्धा केले आहे. पुढे ते म्हणतात, भारत हा उत्सवप्रिय देश आहे. प्रत्येक उत्सव आपण सर्वजण मोठ्या आनंदाने साजरा करीत असतो. यावर्षी सुद्धा लोकशाहीचा उत्सव देशभरात साजरा होत आहे. भारत हा जगातील सर्वात मोठा लोकशाही देश मानला जातो. या लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी आणि देशाच्या उज्वल भविष्यासाठी सर्वांनी लोकशाही प्रक्रियेत आपला सहभाग नोंदवून मतदानाचे कर्तव्य पार पाडायचे आहे.

भारतीय संविधानाने आपल्याला मतदानाचा अधिकार दिला आहे. या मतदानाच्या माध्यमातूनच आपण आपले भविष्य घडवू शकतो. देशाच्या भविष्यासाठी प्रत्येक मत महत्वाचे आहे. मतदानापासून कोणीही वंचित राहू नये, म्हणून मतदानाच्या दिवशी सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. चंद्रपूर जिल्हा प्रशासन निःष्पक्ष आणि मुक्त वातावरणात निवडणुका घेण्यासाठी कटिबध्द आहे.

त्यामुळे येत्या 19 एप्रिल 2024 रोजी 13 - चंद्रपूर लोकसभा मतदारसंघासाठी होणा-या निवडणुकीत सहभागी व्हा. विशेष म्हणजे कोणाच्याही दबावात न येता निर्भिडपणे मतदान करा. लक्षात ठेवा मतदानाची वेळ ही सकाळी 7 ते सायंकाळी 6 वाजेपर्यंत आहे. त्यामुळे सर्व कामे बाजुला ठेवून कर्तव्य म्हणून सर्वांनी मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन जिल्हाधिका-यांनी पत्रातून केले आहे.

# चांदेकसारे हद्दीत राष्ट्रीय महामार्ग क्र. १६० वर साईभक्ताचा अपघाती मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**किसन पवार**

**कोपरगाव :** सिन्नर शिर्डी या राष्ट्रीय महामार्ग क्र. १६० व बाजूस असणाऱ्या पालखी मार्गाचे काम अर्धवट राहिल्यामुळे मुंबईकडून शिर्डी कडे जाणाऱ्या पालख्यांना व साई भक्तांना मुख्य महामार्गावरून चालावे लागते यामुळे शिर्डी कडे पायी जाणाऱ्या एका महीला साईभक्ताचे अपघातात दुर्दैवी निधन झाल्यामुळे सगळीकडे हळहळ व्यक्त होत आहे. व महामार्ग प्राधिकरणाविषयी नागरिकांमधून रोष व्यक्त होत आहे.

रामनवमीचा उत्सव साजरा करण्यासाठी देशाच्या कानाकोपऱ्यातून भाविक शिर्डीला येत असतात मुंबई कडून शिर्डी कडे असंख्य पालख्या यानिमित्ताने सतत येत असतात व आताही गेल्या काही दिवसांपासून चालू आहेत या पालख्यातून येणाऱ्या साई भक्तांना अपघात होऊ नये त्यांचे जीवन सुरक्षित रहावे व त्यांना साई भक्ती चा निसिम आनंद घेता यावा याकरिता राष्ट्रीय महामार्ग १६० च्या बाजूला खास एक पालखी मार्ग तयार करण्यात आला. त्याच्यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने जमीन संपादन करण्यापासून ते महामार्ग तयार करेपर्यंत हजारो कोटी रुपये खर्च केलेत, मात्र हा पालखी मार्ग अर्धवट अवस्थेत राहिल्यामुळे व महामार्गाचे काम देखील ठेकेदार अर्धवट सोडून पळून गेल्यामुळे प्रवाशांना व साई भक्तांना अनेक यातना सहन कराव्या लागत आहे याचाच परिपाक म्हणून दुर्दैवाने या महिला साई भक्ताला आपला जीव गमवावा लागलेला आहे.

हा महामार्ग साईभक्तासाठी एक दिवा स्वप्न ठरल्याचे चित्र समोर आले आहे. सिन्नर ते सावळीविहीर फाटा पालखी मार्गाचे संपूर्ण अंतरात चौदा ठिकाणी २९२३ मीटर अंतराचे काम अर्धवट अवस्थेत असून काम सोडून ठेकेदार निघून गेला आहे. सदर अंतरात सावळीविहीर फाटा ,झगडे फाटा, पांगरी ,वावी येथे उड्डाणपूल ,पुल अर्धवट सोडलेले आहे. त्यामुळे रहदारीला अडथळा होऊन वारंवार अपघात होतात. रहदारीची कोंडी होते प्रवाशांचे वाहन धारकांचे हाल होतात. ह्या अंतरात खोपडी व पांगरी येथे कोट्यावधींचे भक्त निवास बांधले पण त्याचे हस्तांतरण नाही. या उलट सदर मार्गावर ठेकेदाराला जून २०२३ मध्ये टोल वसूलीची परवानगी देण्यात आली आहे मात्र काम बंद आहे. झगडे फाटा व सावळी विहीर फाटा या ठिकाणी बांधलेले उड्डाणपूल हे फक्त स्वागत कमानी पुरतेच उरलेले असल्याचे चित्र दिसत आहे.

# मतदानाची टक्केवारी वाढण्यासाठी जिल्हा प्रशासनाचा अभिनव उपक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** 19 एप्रिल रोजी चंद्रपूर लोकसभा मतदारसंघात होणाऱ्या निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी जिल्हा प्रशासनातर्फे SVEEP (SYSTEMATIC VOTER'S EDUCATION AND ELECTORAL PARTICIPATION) अंतर्गत वेगवेगळे उपक्रम राबविण्यात येत असून मतदारांना आकर्षित करण्यासाठी जिल्ह्यात 85 मतदान केंद्रे वेगवेगळ्या थीमवर सजविली जाणार आहेत.

2019 च्या निवडणुकीमध्ये ज्या मतदान केंद्रावरील मतदान 50 टक्क्यांपेक्षा कमी होते किंवा ज्या मतदान केंद्रावरील टक्केवारी 50 ते 65 टक्के इतकीच होती, अशा परिसरातील मतदारांमध्ये उत्साह निर्माण व्हावा व त्यांचा संपूर्ण सहभाग नोंदवून मतदानाची टक्केवारी वाढविता यावी, म्हणून चंद्रपूर जिल्ह्यातील औद्योगिक समुहामार्फत 50 मतदान केंद्र, बांबु संशोधन व प्रक्षिक्षण केंद्रामार्फत 5, आदिवासी विकास प्रकल्पामार्फत 10, वन विभागामार्फत 10, महिला व बाल विकास कार्यालयामार्फत 10 अशा एकूण 85 मतदान केंद्रावर वेगवेगळया थीम ठेवून मतदान केंद्र तयार करण्यात येणार आहे.

यात औद्योगिक समुहामध्ये अल्ट्राटेक सिमेंट लिमी. आवाळपुर, धारीवाल इन्फ्रास्ट्रक्चर, सी.टी. पी.एस.चंद्रपूर, अंबुजा सिमेंट लि. व दालमिया सिमेंट लि, धारीवाल इन्फ्रास्ट्रक्चर, ए.सी.सी. सिमेंट लि., कोल माईन्स चंद्रपुर, वेकोली वणी-माजरी, साई वर्धा पॉवर जनरेशन प्रा.लि., एम.ई. एल (सेल) चंद्रपुर, बिल्ट बल्लारपुर इंडस्ट्रिस, राजुरी स्टिल मुल, पावर ग्रिड भद्रावती, एम्टा भद्रावती, श्री. सिध्दवली इस्पात लि.,लॉयड मेटल ॲन्ड एनर्जी लि., चमन मेटॅलिक लि., सनविजय रोलींग ॲन्ड इंजिनियरिंग लि., लाईमस्टोन प्रा.लि. कोरपना, एमआयडीसी असोसिऐशन, ऑरोबिंदो कोल माइन्स भद्रावती, केपीसीएल भद्रावती, जीएमआर वरोरा, सनफ्लॉग आर्यन ॲन्ड स्टिल प्रा. लि. वरोरा या कंपन्या मार्फत एकूण 50 मतदान केंद्रे सजविली जाणार आहेत.

तर बांबु संशोधन व प्रशिक्षण केंद्र चिचपल्ली मार्फत बल्लारपुर, पहामी, खुटाळा, लोहारा



ही मतदान केंद्रे, वन विभागामार्फत बोरगाव देश, संजय नगर, शास्त्रीनगर, दुर्गापुर, चोरा, विसापुर, ब्रम्हपुरी, लोहारा, वाढोणा, पारोधी ही केंद्रे, आदिवासी विकास प्रकल्प चंद्रपुर व चिमूर मार्फत धोपटाळा, नांदा, येरमी येंसापुर, म्हसली, चिमूर, जिवती, पिपरी नेरी, महिला व बाल विकास विभागामार्फत ब्रम्हपुरी, बल्लारपुर, घुग्घुस, कोरपना, वडाळा पैकु, गडचांदुर, राजुरा, पंचशील वार्ड, सास्ती, गोवारी या मतदान केंद्रावर वेगवेगळया थिम ठेवून 'थिमॅटीक पोलिंग स्टेशन' तयार करण्यात येणार आहेत.

त्याचप्रमाणे स्वीप अंतर्गत मतदानाची टक्केवारी वाढविण्याकरिता मतदान केंद्रस्तरीय अधिका-यां मार्फत मतदान चिठ्ठी वाटप करण्यात आलेली आहे व त्याचा पडताळणी अहवाल रोज घेण्यात येत आहे. निवडणुकीच्या दिवशी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी जिल्हातील शासकीय अधिकारी / कर्मचारी. आस्थापना, सर्व उद्योग समुह, महामंडळे, कंपन्या व संस्था आदींना सुट्टी जाहीर करण्यात आली असून मतदान केंद्रावर प्रथमोपचार पेटी व वैद्यकीय सुविधा, दिव्यांग मतदाराकरीता व्हिलचेअर, जेष्ठ नागरिकांकरीता ई- ऑटो सुविधा, बाळंतपण महिला करीता हिरकणी कक्ष, पाळणाघर सुविधा, मतदारांच्या मदतीकरीता मदत कक्ष व प्रतिक्षा कक्ष, पिण्याच्या पाण्याची सुविधा, रांगेत असलेल्या मतदाराना उष्णतेपासून बचावाकरीता शेडची व्यवस्था, व सेल्फी पॉईट उभारण्यात येणार आहेत.

तरी जास्तीत जास्त नागरिकांनी आपला मतदानाचा हक्क बजावून मतदानाची टक्केवारी वाढविण्याकरीता प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी केले आहे.

# अल्पवयीन मुलीवर बलात्कार; आरोपीवर पोक्सो दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**कोपरगाव :** शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत रहिवासी असलेल्या एका अल्पवयीन मुलीवर बलात्कार केल्या प्रकरणी आरोपी तौसिफ बागवान याचे विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याविरुद्ध पोक्सोचा गुन्हाही दाखल करण्यात आल्याची खळबळजनक माहिती हाती आली आहे.

सदरचे सविस्तर वृत्त असे की,"कोपरगाव शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत रहिवासी असलेल्या अल्पवयीन मुलीस चार मुलांचा बाप असलेल्या एका इसमाने ऑगष्ट २०२३ पासून गोड बोलून आपल्या वासनेची शिकार बनवली असून त्याने तिच्या गोड बोलण्याचा गैरफायदा घेतला असल्याची धक्कादायक माहिती उघड झाली असून सदर मुलीस त्रास होऊ लागल्याने त्या बाबत तिने आपल्याला होत असलेल्या त्रासाबाबद आपल्या आईस माहिती होती.गत सात साडेसात महिन्या पासून होत असलेल्या त्रासाने वैतागून तिने हि बाब आपल्या आईच्या निदर्शनास आणून दिल्याने सदर घटना उघड झाली आहे. या प्रकरणी आईसह तिच्या नातेवाईकांनी व सामाजिक कार्यकर्त्यानी पुढाकार घेऊन आरोपी विरुद्ध दि.१५ एप्रिल २०१४ रोजी रात्री उशिरा गुन्हा दाखल केला असल्याची माहिती उपलब्ध झाली आहे.

दरम्यान ही घटना उघड आल्यावर सदर घटना आपल्या अंगलट आल्याची बाब लक्षात आल्यावर आरोपीने पलायन केले होते.मात्र पोलिसांनी त्याचा माग काढून त्यास बीड जिल्ह्यातून जेरबंद केले असून या प्रकरणी त्यास बेड्या ठोकल्या असल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली आहे.

दरम्यान कोपरगाव शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रदीप देशमुख,सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री.भामरे आदींनी घटनास्थळी भेट दिली आहे.घटनास्थळी पंचनामा करण्याचे काम सूरु असल्याची माहिती हाती आली आहे.

दरम्यान त्यावरून तालुका पोलीस ठाण्यात या प्रकरणी काल रात्री उशिरा गुन्हा क्रं.१९५/२०२४ भा.द.वि.कलम ३७६,३७६(अ),लैंगिक अपराधापासून बालकांचे संरक्षण अधिनियम २०१२ कलम ४,८ प्रमाणे आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पुढील तपास पोलीस निरीक्षक प्रदीप देशमुख यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक भामरे हे करत आहेत.

दरम्यान कोपरगाव शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका अल्पसंख्याक समाजाच्या मुलीवर जुलै २०१७ मध्ये बलात्कार झाला असल्याचा (वस्तुस्थिती तशी नसताना) आरोप करून त्यावेळी मोठे रान उठवले होते. मोठा कोपरगाव बस स्थानकाजवळून मोठा मोर्चा आयोजित केला होता. त्यात पालकमंत्री, आमदार, खासदार आदींनी आपल्या राजकीय भाकरी भाजून घेतल्या होत्या. अ.नगर, नाशिक, मालेगाव, छत्रपती संभाजीनगर आदी ठिकाणाहून मोठा जनसमुदाय उपस्थित राहिला होता. "कोपरगाव को जला देंगे" च्या घोषणा दिल्या होत्या. त्यावेळी कोपरगाव येथील एका पत्रकाराने वस्तुस्थिती समोर आणली होती.तर त्यावर आपली विवेकबुद्धी गहाण ठेवणाऱ्या एका गटाने थेट त्या पत्रकाराच्या कार्यालयावर समूहाने हल्ला चढवला होता. आता एका बहुसंख्याक समाजाच्या अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार झाला असून या समाजातील नेते आणि कार्यकर्ते आदी तिला न्याय देण्यासाठी किती पुढाकार घेणार ? की केवळ बघ्याची भूमिका घेणार ? असा सवाल निर्माण झाला आहे.



# प्राथमिक आरोग्य उपकेंद्राला मुहूर्त सापडेना

## प्रशासनासह, लोकप्रतिनिधींचे अक्षम्य दुर्लक्ष

आधुनिक केसरी न्यूज

**वाशिम :** रिसोड येथील स्थानांतरित प्राथमिक आरोग्य उपकेंद्र तालुक्यातील कोयाळी जाधव येथे सुरू करण्याबाबतचा शासन निर्णय २०१९ मधे मंजूर झाला आहे. त्यासाठी लागणारे कागदपत्र व ईतर पूर्तता स्थानिक ग्राम पंचायतने सादर केल्या आहेत. परंतू जिल्हा आरोग्य विभागाच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे पाच वर्षे लोटूनही आरोग्य उपकेंद्राच्या कामासाठी मुहुर्त सापडेना. परिणामी या प्रलंबीत मागणीसाठी येथील ग्रामस्थांनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निवेदन सादर केले आहे.

ग्रामीण भागातील सर्व सामान्य नागरीकांना आरोग्या विषयीच्या शासकीय सोई सुविधा सहज उपलब्ध व्हाव्यात यासाठी शासन सर्वोतोपरी प्रयत्न करत आहे. मात्र प्रशासनातील अधिकाऱ्यांच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे गोरगरिबांना शासकीय सोई सुविधापासुन वंचीत राहावे लागत आहे. रिसोड येथे लोकसंख्येच्या निकषानुसार नगर परिषदेचा आरोग्य विभाग व राज्य शासनाचे ग्रामीण रुग्णालय सुरू झाल्यामुळे येथील पूर्वीच्या आरोग सुविधा मागणीनुसार इतरत्र स्थानांतरीत करण्यात आल्या आहेत. त्या अनुषंगाने एक आरोग्य उपकेंद्र कोयाळी जाधव येथे दि.२१ सप्टेंबर २०१९ रोजी देण्याचे मंजूर करण्यात आले आहे. परंतू जवळपास पाच वर्षांचा कालावधी उलटूनही सदर कामाचा मुहूर्त सापडत नसल्याने येथील ग्रामस्थ संबंधित प्रशासनाप्रति रोष व्यक्त करीत आहेत. सदर कामासाठी लागणारी जागा व ईतर सर्व ठराव येथील ग्राम पंचायतने संबंधित विभागाकडे सुपूर्द करूनही सदर काम अद्यापही प्रलंबीतच आहे. त्यासाठी येथील ग्रामस्थांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निवेदन देऊन आरोग्य उपकेंद्र लवकरात लवकर सुरू करण्याची मागणी केली आहे.

लोकप्रतिनिधी सुद्धा उदासीनच, ग्रामस्थांची टोकाची भूमिका.
येथील प्राथमिक आरोग्य उपकेंद्राच्या प्रलंबीत कामासाठी संबंधित प्रशासन जेव्हढे जबाबदार आहे, तेव्हढेच स्थानिक आमदार, खासदार, जिल्हा परिषद सदस्य आदी लोकप्रतिनिधी सुद्धा जबाबदार असल्याचे बोलले जात आहे. परिणामी येथील संतप्त गावकऱ्यांना आगामी निवडणूकीत मतदानावर बहिष्कार घालण्याची टोकाची भूमिका घ्यावी लागणार असल्याचे ग्रामस्थ बोलत आहेत. त्यामुळे सर्व सामान्य नागरीकांच्या मूलभूत गरजाविषयी लोकप्रतिनिधींची उदासीनता पुन्हा एकदा चव्हाट्यावर येणार असल्याची चर्चा जोर धरत आहे.

# डॉ. कल्याण काळे यांच्या प्रचारार्थ आज जालन्यात महाविकास आघाडीची बैठक

आधुनिक केसरी न्यूज



**जालना :** जालना लोकसभा मतदार संघाचे इंडिया (महाविकास)आघाडीचे उमेदवार डॉ. कल्याण काळे यांच्या प्रचारार्थ उद्या 19 एप्रिल शुक्रवार रोजी इंडिया (महाविकास)आघाडीच्या जालना विधानसभा मतदार संघातील पदाधिकारी, कार्यकर्त्यांची व्यापक बैठक आयोजित करण्यात आली आहे. जालना शहरातील अंबड रोडवर असलेल्या गोल्डी लॉन्स मध्ये शुक्रवारी सकाळी 9.30 वाजता आयोजित करण्यात आलेल्या या बैठकीस जालना लोकसभा मतदार संघाचे उमेदवार डॉ. कल्याण काळे, आ.कैलास गोरंटयाल, आ. राजेश राठोड, जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजाभाऊ देशमुख, शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे)पक्षाचे जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते एकबाल पाशा, राष्ट्रवादी काँग्रेसचे(शरद पवार गट) जिल्हाध्यक्ष डॉ. निसार देशमुख, जालना शहर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष शेख महेमुद, समाजवादी पक्षाचे जिल्हाध्यक्ष शेख नबी शिपोरकर, आपचे जिल्हाध्यक्ष संजोग हिवाळे, संभाजी ब्रिगेडचे प्रदेश पदाधिकारी संतोष गाजरे आदी मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. या महत्त्वाच्या बैठकीस जालना विधानसभा मतदार संघातील इंडिया(महाविकास)आघाडीच्या सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी उपस्थीत रहावे असे आवाहन इंडिया(महाविकास)आघाडीच्या वतीने करण्यात आले आहे.

# किनी येथे कलशारोहण, मूर्ती प्रतिष्ठापना

आधुनिक केसरी न्यूज



**भोकर :** किनी (ता.भोकर) येथील महादेव व मारोती मंदिरात मुर्ती प्रतिष्ठापणा व कलशारोहन सोहळा उत्साहात पार पडला असून या निमित्ताने सात दिवस महाप्रसाद, पारायण, कीर्तन, काकड आरती, रामकथेच आयोजन करण्यात आले आहे. मंगळवारी (ता.२३) सोहळ्याची सांगता होणार आहे.

येथील मंदिराचे जीर्णोद्धार करण्याचा निर्णय ग्रामस्थांनी घेऊन सुमारे एक कोटी रूपये खर्च करून भव्यदिव्य मंदिर उभारण्यात आले आहे.बालयोगी व्यंकटस्वामी महाराज पिंपळगावकर यांच्या हस्ते सोमवारी (ता.१५) कलशारोहण व मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली. गावातील भक्त व माहेर घरच्या महिलांना आहेर स्वरूपात भेटवस्तू देऊन गौरव करण्यात आला आहे. या निमित्ताने माधव महाराज बोरगडीकर, गणेश महाराज बेंद्रिकर, निळोबा महाराज हरवलकर, परमेश्वर महाराज शहापूरकर, चंद्रकांत महाराज ऊस्मान नगर, सुर्यकांत महाराज होळकर, श्यामसुंदर महाराज आष्टिकर आणि मंगळवारी (ता. २३)कान्होपात्रा बाई बामणीकर यांचे काल्याच्या किर्तन व महाप्रसादाने सोहळ्याची सांगता करण्यात येणार आहे. पंचक्रोशीतील भक्तानी याचा लाभ घ्यावा असे आवाहन समस्त ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे. किनी येथील सामाजिक कार्यकर्ते तथा ऊद्योजक रवी पत्की यांनी मंदिरास (४० हजार रुपये) किमंतीचे दोन कलश स्मृतीशेष आई, मालतीबाई मधूकर पत्की , वडील मधूकर पत्की यांच्या स्मरणार्थ दान दिले आहेत. रवी पत्की हे मागील अनेक वर्षांपासून समाजीतील ऊपक्षीत घटकांना मदितीचा हात पुढे करून आधार देण्यासाठी नेहमीच पुढाकार घेत असतात.त्यांच्या या उपक्रमाचे सर्वस्तरातून कौतुक केलं जातं आहे.



# सोनावणे वस्ती रस्ता दगडी, कट्टा काम पूर्ण

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील बाजार सावंगी येथील सोनवणे लोकवस्ती रस्ता कामातील मुख्य काम जाळी दगडी कट्टा काम शेवटी पुर्ण झाले आहे. आमदार मा प्रशांत भाऊ बंब यांच्या डीपीडीएसतून ८४लक्ष रुपये किंमतीची जाळी दगडी कट्टा काम आज रोजी पुर्ण झाले आहे.सोणवणे वस्ती रस्ता, पाणंद रस्ता रोजगार हमी योजनेतून गत दोन वर्षांपासून मंजुर व निधी पडून आहे. मात्र प्रशासनाकडून या ना त्या कारणाने रस्ता कामात चालढकल सुरु आहे. यासंदर्भात आमदार प्रशांत भाऊ बंब यांनी ही तातडीने काम करण्याचे आदेश तालुकास्तरी आमसभेत दिली आहे. मात्र ते काम अद्याप ही सुरू होत नाही. त्यात आमदार यांनी डिपीडीएस तून ८४लक्ष रुपये निधी तून जाळी दगडी कट्टा काम दोन महिन्यांत पुर्ण करण्यात आले आहे.पुढे अद्याप रस्ता खडीकरण मजबुतीकरणाचे काम बाकी आहे. आता त्याकामाला केंव्हा मुहूर्त मिळते ते पाहणे आहे. झालेल्या जाळी दगडी कट्टा कामामुळे लोकवस्ती धारक व त्या लगत चे ये जा करणारे नागरिक खुश झाले आहे.

# डॉ. बाबासाहेब जयंती पाडळी येथील नरसिंह वाचनालयात उत्साहात साजरी

आधुनिक केसरी न्यूज



**खुलताबाद :** तालुक्यातील पाडळी येथील पाडळी येथे नरसिंह सा. वाचनालयात डॉ. बाबासाहेब आबेडकर जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी गावातील मान्यवर उपस्थित होते. अध्यक्ष भरत पा काळे, संजय वहाटुळे, कैलास आबा, भिमराव घुगरे, पो. पा. योगेश गायके, किशोर आहेवाड, ज्ञानेश्वर आहेवाड, विजय गायकवाड, दौलत बापु, पवन काळे, ज्ञानेश्वर नलावडे इत्यादी मान्यवर हजर होते. भीमराव पोलीस पाटील यांनी आभार मानले.

# महायुतीच्या उमेदवार अर्चना पाटील, राम सातपुते यांचाही पाठिंबा

## प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाला ग्वाही

आधुनिक केसरी न्यूज

**धाराशिव :** महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाने वृत्तपत्रांना ऊर्जितावस्था मिळवून देण्यासाठी केंद्र सरकारकडे वृत्तपत्र खरेदी करणाऱ्यांना उत्पन्न करात वार्षिक 5 हजार रुपये सूट द्यावी, ही मागणी लावून धरली आहे. धाराशिव लोकसभेच्या महायुतीच्या उमेदवार अर्चनाताई राणा जगजितसिंह पाटील आणि सोलापूर लोकसभेचे महायुतीचे उमेदवार राम सातपुते यांनीही पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या मागणीला पाठिंबा दिला आहे.

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्यावतीने प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने धाराशिव लोकसभेच्या महायुतीच्या उमेदवार अर्चनाताई राणा जगजितसिंह पाटील, सोलापूर लोकसभेचे महायुतीचे उमेदवार राम सातपुते यांची भेट घेऊन चर्चा केली. कोरोना वैश्विक महामारीनंतर महाराष्ट्रासह संपूर्ण देशात वृत्तपत्र व्यवसायावर मोठा परिणाम झाला. वृत्तपत्र खप आणि जाहिरातींचे प्रमाणही कमी झाले आहे. परिणामी वृत्तपत्र व्यवसायावर अवलंबून असलेले पत्रकार आणि इतर कर्मचाऱ्यांसमोर रोजगाराचाच प्रश्न निर्माण झाला आहे. देशभरात छोट्या-मोठ्या वृत्तपत्रांचा 35 हजार कोटी रुपयांचा व्यवसाय अडचणीत आला आहे. यासाठी केंद्र सरकारने वृत्तपत्र खरेदी करणाऱ्या आयकरदात्यांना उत्पन्न करात वार्षिक 5 हजार रुपयांची सूट द्यावी, अशी मागणी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी केली. या मागणीला धाराशिव लोकसभेच्या महायुतीच्या उमेदवार अर्चनाताई राणा जगजितसिंह पाटील, सोलापूर लोकसभेचे महायुतीचे उमेदवार राम सातपुते यांनी पाठिंबा देत या निवडणुकीत आपला विजय झाल्यास लोकसभेत हा विषय प्राधान्याने मांडला जाईल, असे अभिवचन दिले. यावेळी पत्रकार संघाचे मराठवाडा विभागीय अध्यक्ष वैभव स्वामी, राज्य कार्यकारणी सदस्य बाबासाहेब देशमाने, पत्रकार संघाचे धाराशिव जिल्हाध्यक्ष धनंजय पाटील, पत्रकार संघाचे धाराशिव येथील पदाधिकारी श्रीराम क्षीरसागर, रामेश्वर डोंगरे, सय्यद कलीम मुसा यासह पत्रकार उपस्थित होते.




**राज्यातील 100 उमेदवारांना पत्रकार संघ देणार निवेदन : वसंत मुंडे**
केंद्र सरकारने वृत्तपत्र खरेदी करणाऱ्यांना उत्पन्न करात वार्षिक 5 हजार रुपये सूट द्यावी, ही मागणी केंद्र सरकारकडे लावून धरली आहे . या मागणीला लोकसभा निवडणुकीच्या रिंगणात असलेल्या उमेवारांकडून पत्रकार संघाला सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे . संपूर्ण राज्यभर प्रत्येक जिल्ह्यात पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष, स्थानिक पदाधिकारी उमेदवारांच्या भेटी घेत आहेत . राज्यातील 100 उमेदवारांना पत्रकार संघ निवेदन देणार आहे . अशी माहिती महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी माध्यमांशी बोलताना दिली .




# शरद पवारांनी शिवसेना संपवण्याचे अनेक प्रयत्न केले : दीपक केसरकर यांचा आरोप

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी शिवसेनेला संपवण्याचे अनेक प्रयत्न सातत्याने केले. याउलट पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजपाने शिवसेनेबरोबरची युती कायम ठेवण्याचे प्रयत्न केले. मात्र उद्धव ठाकरे हे पवारांच्या जाळ्यात फसल्यामुळे पंतप्रधान मोदी आणि भाजपावर ते खोटे-नाटे आरोप करून सहानुभूती मिळवण्याचा प्रयत्न करत आहेत, असे प्रतिपादन शिवसेनेचे ज्येष्ठ नेते आणि शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी गुरुवारी केले. भाजपा-शिवसेना-राष्ट्रवादी महायुतीतर्फे झालेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत श्री.केसरकर बोलत होते. राष्ट्रवादीचे नेते आणि मदत, पुनर्वसन मंत्री अनिल पाटील, महायुतीचे समन्वयक आ.प्रसाद लाड, रिपब्लिकन पक्षाचे (आठवले गट) प्रदेश सरचिटणीस गौतम सोनवणे, भाजपा प्रदेश माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन आदी यावेळी उपस्थित होते. बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांवर निष्ठा असलेल्या शिवसैनिकांनी पवारांच्या भुलथापांना बळी पडू नये, असेही केसरकर यांनी नमूद केले. केसरकर म्हणाले की, शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांनी लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भारतीय जनता पार्टी यांच्या विरोधात अनेक बेताल आरोप केले आहेत. बाळासाहेबांच्या विचारांवर निष्ठा असणाऱ्या शिवसैनिकांनी वस्तुस्थिती जाणून घेणे आवश्यक आहे. शरद पवारांनी बाळासाहेब ठाकरे हयात असतानाच शिवसेनेत फूट पाडली, हे जगजाहीर आहे. 2014 नंतर ही अनेक घडामोडीत पवार यांनी शिवसेनेसारखी लढाऊ संघटना कशी संपेल, या दृष्टीनेच प्रयत्न केले. यावेळी केसरकर यांनी गेल्या 10 वर्षातील अनेक राजकीय घडामोडींवेळी पडद्यामागे घडलेल्या घटनांचा संदर्भ देत श्री.पवार यांचा शिवसेनेबद्दलचा आकस, द्वेष दाखवून दिला. 2014 च्या विधानसभा निवडणुकीत कोणत्याच पक्षाला स्वबळावर बहुमत मिळाले नाही, हे पाहून श्री.पवार यांनी भारतीय जनता पार्टीला न मागताच पाठिंबा जाहीर केला. त्या विधानसभा निवडणुकीत भाजपा-शिवसेना स्वतंत्रपणे लढले होते. भाजपा आणि शिवसेना पुन्हा एकत्र येऊ नयेत, या इच्छेमुळेच पवार यांनी भाजपा ला बिनशर्त पाठिंबा जाहीर केला होता, असे श्री.केसरकर यांनी नमूद केले. 2017 मध्ये भाजपा आणि राष्ट्रवादी एकत्र येण्याच्या हालचाली सुरू झाल्या होत्या. त्यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शिवसेनेबरोबर असलेली युती कायम राहिली पाहिजे, अशी भूमिका ठामपणे मांडली होती. श्री.पवार यांनी त्यावेळी शिवसेना बरोबर असेल तर आम्ही भाजपाबरोबर जाणार नाही, शिवसेनेबरोबरची युती तोडली तरच आम्ही तुमच्या बरोबर येऊ, असे भाजपा नेतृत्वाला कळवले होते. यावेळीही पवारांचा शिवसेनेबद्दलचा आकस दिसून आला. राष्ट्रवादी काँग्रेसमधील अनेक नेते या घडामोडींचे साक्षीदार आहेत, असे केसरकर यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले की, 2019 मध्येही पवारांची भारतीय जनता पार्टीबरोबर जाण्याची इच्छा होती. मात्र त्या वाटाघाटी फिसकटल्याने त्यांनी उद्धव ठाकरे आणि काँग्रेसला साथीला घेत सरकार बनवले. शिवसेना संपल्याखेरीज राष्ट्रवादी वाढणार नाही, असा श्री.पवार यांचा समज असल्याने त्यांनी नेहमीच शिवसेनेचे पाय ओढण्याचे राजकारण केले. आता याच पवारांनी राजकीय स्वार्थासाठी भाजपा विरोधात अपप्रचार सुरू केला आहे. दर दोन दिवसांनी महायुतीच्या वतीने पत्रकार परिषद घेऊन मविआ नेत्यांची पोलखोल केली जाईल, असेही त्यांनी सांगितले.

# जामनेर तालुकास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धा वार्षिक सभा व पारितोषिक वितरण समारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**जामनेर :** महाराष्ट्र राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय पुणे व जळगाव जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जामनेर पंचायत समिती शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, यांच्या संयुक्त विद्यमाने तालुकास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धा वार्षिक सभा व पारितोषिक वितरण समारंभ आज सकाळी ११ वा.जामनेरपुरा येथील इंदिराबाई ललवाणी विद्यालयात उत्साहात संपन्न झाला.

सुरुवातीस मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन कार्यक्रमाचे अध्यक्ष जळगाव जिल्हा क्रीडा अधिकारी रवींद्र नाईक यांच्या शुभहस्ते करण्यात आले यात्रसंगी कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून गटशिक्षणाधिकारी रामकृष्ण लोहार, महाराष्ट्र राज्य शारीरिक शिक्षण व क्रीडा शिक्षक महासंघाचे वरिष्ठ सहसचिव राजेश जाधव, नाशिक विभागीय अध्यक्ष प्रशांत कोल्हे, उपप्राचार्य प्रा.के एन मराठे, लॉर्ड गणेशा स्कूल प्राचार्य धनंजय सिंग, ज्ञानगंगा विद्यालयाचे मुख्याध्यापक राजेंद्र सोनवणे, बोहरा सेंट्रल स्कूल प्राचार्या श्रीदेवी नायर, जळगाव जिल्हा युवा शारीरिक शिक्षण व क्रीडा शिक्षक महासंघाचे सचिव प्रा.हरीश शेळके, कार्याध्यक्ष सचिन महाजन, जामनेर तालुका क्रीडा संयोजक डॉ.असिफ खान आदी.मान्यवर यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व्ही. एन.पाटील यांनी सूत्रसंचालन डॉ.आसिफ खान यांनी तर आभार प्रदर्शन प्रा.समीर घोडेस्वार यांनी केले.

तालुकास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धाचे उत्कृष्ट आयोजन केल्याबद्दल ६ शाळेचा सत्कार सन्मानचिन्ह, पुष्पगुच्छ देऊन करण्यात आला.

**शालेय स्पर्धेसाठी ६ उत्कृष्ट शाळा पुढील प्रमाणे:-** १.इंदिराबाई ललवाणी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, २.ज्ञानगंगा माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय, ३.लॉर्ड गणेशा इंग्लिश मीडियम स्कूल, ४.पोदार जीनियस इंटरनॅशनल स्कूल, ५.जिकरा इंग्लिश मीडियम स्कूल, ६.बोहरा सेंट्रल स्कूल. तसेच शालेय राष्ट्रीय स्पर्धेमध्ये तालुक्यातून उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल ८ खेळाडूंचा सन्मानचिन्ह पुष्पगुच्छ देण्यात आले. **राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेसाठी निवड झालेले खेळाडू पुढीलप्रमाणे :-** सिमरा आसिफ खान (रायफल शूटिंग), गौरी विजय कुमावत (तायक्वांदो), श्रद्धा श्रीराम शिंदे (डॉजबॉल), मिताली गोपाल मिस्तरी (डॉजबॉल), सोहम विलास जाधव (डॉजबॉल), पंकज प्रवीण गव्हांडे (डॉजबॉल), विनायक परमेश्वर सपकाळे (डॉजबॉल), शालेय स्पर्धेत उत्कृष्ट पंच म्हणून कार्य केल्याबद्दल ५१ क्रीडा शिक्षकांचा सन्मानचिन्ह, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

**वार्षिक पारितोषिक समारंभ सन्मानचिन्ह सौजन्य-** जामनेर तालुका क्रीडा संयोजक डॉ. आसिफ खान यांच्या तर्फे देण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जी.सी. पाटील, व्ही एन पाटील, प्रा.समीर घोडेस्वार,डी के चौधरी, प्रवीण पाटील, नरेंद्र पाटील,आनंद मोरे,शाहिद शेख, जहीर खान, देवा पाटील, वसीम शेख, आसिफ शेख,गजानन कचरे आदी.क्रीडा शिक्षकांनी परिश्रम घेतले.



# सचिन गुमलाडुची पोलिस निरीक्षकपदी निवड

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील तलाववाडी ( वेरुळ) येथील सचिन साहेबसिंग गुमलाडु यांची महाराष्ट्र पोलीस, उपनिरीक्षकपदी निवड झाल्याबद्दल सर्वत्र कौतुक व संत्कार अभिनंदन होत आहे.

नतलाववाडी (वेरूळ) येथील सचिन साहेबसिंग गुमलाडू.. महाराष्ट्र पोलीस उपनिरीक्षकपदी यांची निवड झाल्याबद्दल सत्कार करताना मूलचंद चव्हाण चेअरमन वेरूळ सोसायटी, किशोर भाऊ काळे. विजय भालेराव, राहुल निकुंभ, संजय श्रीखंडे, अमोल गुमलाडू यांनी शुभेच्छा दिल्या.



# जमावाकडून शाळेची तोडफोड; गुन्हा दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**मंचेरियल :** तेलंगणातल्या मंचेरियल जिल्ह्यातील एका मिशनरी शाळेवर हल्ला झाल्याचं प्रकरण नुकतंच समोर आलं आहे. या शाळेच्या मुख्याध्यापकांनी शाळेतील विद्यार्थ्यांच्या धार्मिक पोशाखावर आक्षेप घेतल्यामुळे काही लोकांच्या भावना दुखावल्या त्यानंतर संतप्त जमावाने शाळेवर हल्ला केला आहे. जमावाने शाळेत तोडफोड केली, तसेच शाळेतील कर्मचाऱ्यांना जबर मारहाणही केली. संतप्त जमाव शाळेत घुसून तोडफोड करत असल्याचा व्हिडीओ समाजमाध्यमांवर व्हायरल होत आहे. या शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांनी तक्रार केल्यानंतर पोलिसांनी शाळेचे मुख्याध्यापक, दोन शिक्षक आणि इतर दोघांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. धार्मिक भावना दुखावणे, धर्माच्या आधारावर वेगवेगळ्या गटांमध्ये वाद निर्माण करणे या कलमांखाली पोलिसांनी गुन्हा नोंदवला आहे. गुन्हा नोंदवल्यानंतरही हे प्रकरण शांत झालं नाही. मुख्याध्यापकाच्या कृतीमुळे संतापलेल्या पालकांनी मागणी केली की, शाळेने सर्वांची माफी मागावी. मुख्याध्यापखांनी हिंदूंच्या धार्मिक पोशाखावर आक्षेप घेतल्याचे मेसेजेस व्हायरल झाले. त्यामुळे संतापलेल्या लोकांनी थेट शाळेवर हल्ला केला. शाळेवर झालेल्या हल्ल्याचा व्हिडीओदेखील व्हायरल होत आहे. जमावाने 'जय श्री राम'चा नारा देत शाळेच्या खिडक्या फोडल्या, बाकं, टेबल आणि खुर्च्या तोडल्या. त्यानंतर पोलीस घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी जमावाला रोखले.

# सावळीविहीरीच्या रेणुका कुलकर्णीला फ्रान्स सरकारची ५० लाखांची शिष्यवृत्ती

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** चिकाटी आणि दृढनिश्चयाची हृदयस्पर्शी



कहाणी, शिर्डीजवळील सावळीविहीर या छोट्याशा गावात राहणाऱ्या रेणुका संजय कुलकर्णी यांना फूड इनोव्हेशन आणि प्रॉडक्ट डिझाइनमध्ये पदव्युत्तर शिक्षण घेण्यासाठी प्रतिष्ठित इरास्मस मुंडस शिष्यवृत्ती मिळाली आहे. जवळपास ५० लाख रुपये किमतीची ही शिष्यवृत्ती आंतरराष्ट्रीय शैक्षणिक प्रवासाला निघताना तिचा सर्व खर्च भागवेल. आता, ती इरास्मस मुंडस प्रोग्रामचा एक भाग म्हणून तीन प्रसिद्ध विद्यापीठांमध्ये शिकणार आहेः फ्रान्समधील ॲग्रोपॅरिसटेक विद्यापीठ, आयर्लंडमधील डब्लिन येथील टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटी आणि इटलीमधील यूनिना विद्यापीठ. इरास्मस मुंडस शिष्यवृत्ती ही अत्यंत स्पर्धात्मक शिष्यवृत्ती आहे, तसेच ह्या अभ्यासक्रमासाठी दरवर्षी केवळ २४ विद्यार्थी जागतिक स्तरावर निवडले जातात. यापैकी केवळ १८विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळते. स्पर्धा तीव्र आहे, ज्यामुळे रेणुकाचे यश अधिक प्रशंसनीय आहे.

फूड इनोव्हेशन अँड प्रॉडक्ट डिझाइन (FIPDES) कोर्स दोन शैक्षणिक वर्षांमध्ये नियोजित आहे. नाविन्यपूर्ण, शाश्वत आणि निरोगी अन्न उत्पादनांच्या विकासात योगदान देऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रशिक्षित करण्यासाठी हा कोर्स विकसित केला गेला आहे. कुटुंबाकडून प्रोत्साहन मिळाल्याने रेणुकाने फूड टेक्नॉलॉजी मध्ये बी. टेक. करायचे ठरवले.रेणुका सांगते की, लहानपणापासून छोटासा शेवया बनवायचा व्यवसाय असलेल्या तिचा आई कडून तिने प्रेरणा घेऊन फूड टेक्नॉलॉजीची निवड केली. रेणुकाचा यशापर्यंतचा प्रवास आव्हानांशिवाय नव्हता. मध्यमवर्गीय शेतकरी कुटुंबातील , तिचे आई-वडील, अंजली आणि संजय कुलकर्णी यांच्या अतूट पाठिंब्याने रेणुकाने हे सिद्ध केले की जिथे इच्छा असते, तिथे मार्ग असतो. रेणुकाचा मोठा भाऊ तुषार याला २०१८साली अशाच प्रकारची शिष्यवृत्ती देण्यात आली होती, अशा रीतीने हे दोघेही दाखवून देतात की लहान गावात राहूनही आपण मोठे यश मिळवू शकतो. रेणुका तिच्या अन्न प्रक्रिया आणि तंत्रज्ञानाच्या ज्ञानाद्वारे त्यांच्या उन्नतीसाठी योगदान देणार आहे.

मुलीना प्रोत्साहन दिले पाहिजे असे मत आई अंजली वडील संजय कुलकर्णी यांनी मत व्यक्त केले.

रेणुका हीचे यश भारतातील मध्यमवर्गीय कृषी आधारित कुटुंबांसाठी प्रेरणादायी आहे. आर्थिक मर्यादा कोणालाही त्यांच्या स्वप्नांचा पाठपुरावा करण्यापासून परावृत्त करू नये हा विश्वास अधोरेखित करते. दृढनिश्चय आणि पाठिंब्याने कोणत्याही अडथळ्यावर विजय मिळवता येतो. रेणुका कुलकर्णी ही सुनील कुलकर्णी स्मिता कुलकर्णी यांची पुतणी आहे.



# साईभक्त भाविकांकडून ३१ लाखांचे डिश वॉशिंग मशिन भोजनालयासाठी दान

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** राष्ट्रपती कार्यालयाने गौरव केलेल्या व राष्ट्रपती द्रोपदी मुर्म यांनी या भोजणालयाची दखल घेऊन सन्मान केलेल्या व वर्षाकाठी काही कोटी भाविकांना चांगल्या प्रकारच्या रुचकर व स्वादिष्ट भोजन प्रसाद देण्यासाठी जे काम सुरू असते त्या प्रसाद भोजनालयासाठी आज दि. १७ एप्रिल २०२४ रोजी श्री रामनवमी उत्सवाचे औचित्यावर श्रीमती सुनिता पोद्दार यांनी श्री साईप्रसादालयास ३१ लाख रुपये किंमतीचे ताशी ४०००डिश क्षमतेचे डिश वाशिंग मशिन देणगी स्वरूपात दिले आहे. यामुळे आणखी कामात गती मानता येणार आहे.

श्री साईप्रसादालयात डिश वाशिंग मशिनचे उदघाटन साईभक्त श्रीमती सुनिता पोतदार व संस्थानचे अध्यक्ष तथा प्रधान जिल्हा न्यायाधीश सुधाकर यार्लगड्डा व सौ. मालती यार्लगड्डा यांचे हस्ते करण्यात आले यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी तुकाराम हुलवळे, कार्यकारी अभियंता भिकन दाभाडे, मॅकेनिकल विभाग प्रमुख अतुल वाघ, श्री साई प्रसादालय विभाग प्रमुख विष्णू थोरात आदी उपस्थित होते.




# राष्ट्रीय शरीर सौष्ठव स्पर्धेचे शिर्डी येथे भव्य आयोजन : डॉ. संजय मोरे

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** पवित्र व धार्मिक नगरी असलेल्या शिर्डी येथे ६४वे वरिष्ठ राष्ट्रीय शरीर सौष्ठव स्पर्धा २९ते ३०एप्रिल रोजी संपन्न होणार असून यासाठी २८ राज्य व आंतरराष्ट्रीय ७००खेळाडु व पदाधिकारी सहभागी होणार असून इंडीयन बॉडी बिल्डीग फिटनेस फेडरेशन यांच्या मार्गदर्शनाखाली होणार असून महाराष्ट्र बॉडी बिल्डर्स असोसिएशन सहकार्य करत असल्याची माहिती सरचिटणीस डॉ. संजय मोरे यांनी दिली याप्रसंगी अध्यक्ष संजय जोशी खजिनदार राजेश सावंत अजय खानविलकर उद्योजक संदीप सोनवणे राजेश सातपुरकर मंदन कडु नरेंद्र कदम आदीसह विविध मान्यवर उपस्थित होते

डॉ. संजय मोरे म्हणाले की, ग्रामीण भागात खेळाचा प्रसार व प्रचार व्यायामाची जोड निर्व्यसनी खेळाडू तयार व्हावे हा हेतू कार्यक्रम घेण्यामागचा आहे १५ लाख रुपये बक्षिसे प्रमाणपत्र सन्मानचिन्हं अशी बक्षिसे आहे. मेन्स बॉडी बिल्डीग १०वजनी गट ५५किलो ते १०० किलोपर्यंत वरिल मेन्स क्लासिक दोन वजनी गट अपटु व इन्वलुडीग १७५ सेंटीमीटर ते १८०,मेस फिजीक १७१सी एम ते १८०सेटीमीटर वरील महिलांसाठी २वजनी गट वुमेन फिजीक ओपन कॅटीगरी बॉडी फिटनेस ओपन कॅटीगरी असे प्रकार आहे. निवास व भोजन व्यवस्था निःशुल्क असुन या स्पर्धेसाठी ७५ लाख रुपये खर्च अपेक्षित धरण्यात आला आहे. महेश गोसावी नारायण पाडेकर मनोज गायकवाड सोहेल शेख निखिल बनसोडे बापु काळे आदी उपस्थित होते.

# उष्माघाताला आळा घालण्यासाठी माठातील पाणी फायदेशीर

## वॉटर फिल्टरच्या जमान्यातही माठांना मागणी कायम

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळसिंग राजपूत**

**सोयगाव :** पिण्याच्या पाण्यापासून होणारे विविध आजार टाळण्यासाठी वॉटर फिल्टरसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार चांगला असला, तरी घराघरात मातीच्या मडक्यांना आजही तेवढीच मागणी असल्याचे चित्र सर्रास पहावयास मिळत आहे. सोयगाव शहरासह सावळदबारा ग्रामीण भागातही वॉटर प्युरिफायर घरोघरी पोहोचले आहेत.

मात्र मडक्यातील पाणी चवदार असल्याचे अनेकांचे म्हणणे आहे. उन्हाच्या झळा वाढू लागल्याने मडक्यांची दुकानेही बाजारात व रस्त्या रस्त्यावर थाटली आहेत. आकारानुसार मडक्यांच्या किमतीत बदल आहेत. त्यामुळे खरेदीची धूम मोठ्या प्रमाणात सुरू आहे. गेल्या आठवड्यापासून तापमानात मोठ्या प्रमाणात वाढ झाली असून गेल्या दोन-तीन दिवसांत उन्हाचा पारा जास्तच चढला आहे. त्यामुळे थंड पाण्याची गरज भासू लागली आहे. विशेषत दुपारी उन्हाची तीव्रता जाणवत आहे. परिणामी मातीच्या मडक्यांनाही मागणी वाढल्याचे चित्र आहे. अनेक घरांमध्ये फ्रीज असले तरी मडक्यांची जागा ही कायम आहे. 'जुने ते सोने' ही म्हण प्रचलित आहे.

उन्हाच्या दाहकतेपासून वाचविण्यासाठी मातीच्या मडक्यातील पाण्यानेच तहान मिटते. उन्हाळ्यात तहान लागल्यावर थंड पाणी पिण्याची तीव्र इच्छा होते. यावेळी बहुतेकजण फ्रीजमधीलच पाणी पितात. मात्र, देशी फ्रीज म्हटल्या जाणाऱ्या मडक्यातील पाण्याची चवच काही निराळीच असते. मडक्यातील पाणी हे आरोग्यासाठी चांगले असते. यात अनेक रोगांशी लढण्याची ताकद असते. उष्माघाताला आळा घालण्यासाठी मातीच्या मडक्यातले पाणी फायदेशीर असते. तसेच मातीत मुबलक मिनरल्स आणि इलेक्ट्रोमॅग्नेटिक ऊर्जा असते. याचा आरोग्यासाठी चांगलाच फायदा होतो यामुळे आरोग्याचा विचार करून या मातीच्या मडक्यांची मागणी होऊ लागली आहे. आरोग्य आरोग्य तज्ज्ञांच्या मते फ्रीजचे पाणी आरोग्यासाठी त्रासदायक ठरते. मातीच्या मडक्यांचे पाणी पिण्यास शरीरासाठी अधिक लाभदायक असल्याचे जाणकार सांगत आहेत.



मडक्यामध्ये पाणी ठेवल्यास त्यात नैसर्गिकरीत्या मॅग्नेशियम, पोटॅशियम ही खनिजे असतात . त्यामुळे शरीरातील कोलेस्ट्रॉलचे प्रमाण कमी होते . उष्माघात होण्यापासून बचाव होतो . माठ नैसर्गिकरीत्या थंड पाणी ठेवतो . उन्हाळ्यात सर्वांनी मडक्यातील पाणी प्यायल्यास आरोग्यास हितकारक राहतं आहे

**मडक्यांच्या किमतीत 20 ते 25 टक्के वाढ :** यंदा बाजारात मडक्यांच्या आकारानुसार 200 ते250 रुपये, तोटी रांजण मडके 500 ते 600 रुपये आहेत . साहित्याचे दर वाढल्याने माठाचे दर वाढत आहेत . महागाई प्रचंड वाढत आहे त्यामुळे काळ्या मडक्याचे भावही गगनाला पोहोचले आहेत . प्रत्येक गावात 10 ते 15 कामगार काम करीत आहेत . गावात फिरून दिवसाला 15 ते 20 माठ प्रत्येक कामगार विकत आहे . ते विकून त्यांना 25 ते 30 रुपये प्रत्येक मडक्यांमागे मिळतात . हे मडके 150 रुपयांपासून 250 रुपयांपर्यंत विक्रीस आहेत . कोळसा व मातीचे भाव वाढल्यानेच मडक्यांचे भाव वाढले आहेत . मागच्या वर्षापेक्षा यंदा मडक्यांच्या किमतीत 20 ते 25 टक्के दराने वाढ झाली आहे .

**शंकर कुंभार ( कोतवाल )सावळदबारा, ता . सोयगाव**

# वनपरिक्षेत्राच्या वन कर्मचाऱ्यांना सावळदबाराचे झाले मुख्यालयास रहाण्याचे वावडे

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** अजिंठा वनपरिक्षेत्र वन विभागातील सावळदबारा वन परिमंडळचे कर्मचारी हे सोयगाव तालुक्यामधे नोकरी करतात मात्र रहायला जालना जिल्ह्यातील भोकरदन तालुक्यामधे धावडा व इतर काही ठिकाणी रहीवास करित आहे. हा प्रकार कित्येकवर्षांपासुन कारभार सुरु आहे. या बेजबाबदार मनमाणी बहाद्दर कर्मचा-यांमुळे वन विभागातील अनेक वृक्ष पाण्याअभावी तडफडु सुकुन गेलेली आहे शासन यांना आफीस कार्यालय कशासाठी देतात येवढा खर्च कशासाठी करतात यांचे वन परिमंडळ कार्यालय नेहमी कुलुप बंद असतं मुख्यालयास न राहता बाहेर गावी राहुन हा लपंडाव अनेक वर्षांपासुन सुरु आहे वरिष्ठ अधीकारी या कर्मचा-यांवरती पुर्णपणे मेहेरबान असल्याचे दिसुन येत आहे वन विभागाचे कर्मचारी अनेक दिवसांपासुन हा खेळ खेळत असुन वन रक्षक सुनिल खरडे आणि वनपाल अविनाश राठोड यांना कधीही कामासंबधी संपर्क साधला असता ते नेहमी सांगतात आम्ही काही रिकामे नाही आम्हाला दररोज नाईट ड्युटी असते मुख्यालयास राहुन त्यांची ड्युटी पुर्ण होत नाहीअसे ही सांगतात हे माहाशय मुख्यालयास थांबण्यास तय्यार नाही यांना परिसरातील नागरीक कंटाळलेले असुन वन विभागाचे कर्मचारी हे मुख्यालयास वास्तव्य करुन राहत नसल्यामुळे सावळदबारा ग्रामपंचायत मधे मुख्यालयास हजर राहत नसल्याचा सरपंच,आणि ग्रामपंचायत सदस्य व गावकरी यांनी ग्रामसभेमधे या संदर्भामधे सर्वानुमते ठराव सुद्धा घेतलेला आहे परंतु तरी सुद्धा या ठरावाला वनरक्षक सुनिल खरडे, वनपाल अविनाश राठोड व इतर कर्मचारी हे जोमानत नाही यांना कायद्याचा कोनताही धाक वचक राहिलेला नाही यांची मनमाणी दादागीरी खुप वाढलेली आहे अजिंठा वनपरिक्षेत्र अधिकारी यांनी व छत्रपती संभाजीनगर डि.एफ. ओ. आणि मुख्यकार्यालय नागपूर वरिष्ठ अधिकारी, वन विभागाच्या कर्मचा-यांवरती लक्ष देणे खुप गरजेचे आहे आणि त्यांच्यावरती नियंत्रण ठेऊन मुख्यालयास नोकरी करण्याचे आदेश हे ही मात्र तितकेच महत्वाचे आहे. यांचा मनमाणी कारभार कधी थांबनार परिसरातील नागरीकांना हा प्रश्न पडलेला आहे.

# जात वैधता प्रमाणपत्राच्या मार्गदर्शनासाठी १९ एप्रिल रोजी ऑनलाईन वेबनार

आधुनिक केसरी न्यूज

**कोपरगाव :** जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी संबंधी येणाऱ्या अडी-अडचणी बाबत मार्गदर्शन करण्यासाठी १९ एप्रिल रोजी ऑनलाईन वेबिनार (WEBINAR) आयोजित करण्यात आला आहे. अशी माहिती जिल्हा जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या वतीने देण्यात आली आहे. महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंतीचे औचित्य साधून सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत राज्यामध्ये "समता पंधरवडा" निमित्त जात प्रमाणपत्र पडताळणीची विशेष मोहिम राबविण्यात येत आहे. "समता पंधरवडा" च्या अनुषंगाने ११ वी व १२ वी विज्ञान शाखेतील विद्यार्थी / सीईटी देणारे / डिप्लोमा तृतीय वर्ष विद्यार्थी यांना जात प्रमाणपत्र पडताळणी संबंधी येणाऱ्या अडीअडचणी (उदा. कोणत्या प्रकारे अर्ज भरावा व कोणते दस्त जोडावे, जाती दावा सिध्द करण्यासाठी लागणारे आवश्यक कागदपत्रे व पुरावे) याबाबतच तसेच बरेच अर्जदार अद्यापही जात प्रमाणपत्र पडताळणीच्या प्रक्रीयेबाबत अनभिज्ञ आहेत. याबाबत मार्गदर्शन तसेच त्यांचे शंकाचे निरसण करणेकरीता जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, अहमदनगर या कार्यालयामार्फत शुक्रवार, १९ एप्रिल २०२४ रोजी दुपारी १:०० वाजता ऑनलाईन वेबीनार (WEBINAR) चे आयोजन करण्यात आलेला आहे. झुम अॅपवर (JOIN ZOOM MEETING LINK - HTTPS://US06WEB.ZOOM.US/J/87954912952?PWD=7VZCNYUK1UOCWZZT7WSBFY84LCJFBT.1 , MEETING ID: 879 5491 2952 , PASSCODE: 713092) या लिंकच्या माध्यमातून या वेबनार मध्ये सहभागी होता येणार आहे. विद्यार्थी, अर्जदार व पालक यांनी सदर ऑनलाईन वेबिनार (WEBINAR) चा लाभ घ्यावा असे आवाहन अहमदनगर जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती यांचे वतीने करण्यात आले आहे.

# निवडणूक प्रक्रियेत 'नोटा'चा वाढता प्रभाव

## २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत ४ लाख ८८ हजार ७६६ मतदारांनी केला होता नोटाचा वापर

आधुनिक केसरी न्यूज

**वसंत पाटील**

**वाशिम :** २०२४ च्या लोकसभा निवडणुकीतील मतदानाचा पहिला टप्पा २६ एप्रिल रोजी पार पडत आहे. त्या अनुषंगाने प्रत्येक पक्ष मतदाराला आपल्याकडे खेचण्याचा प्रयत्न करत आहे. मात्र सद्यस्थितीत सुरू असलेलं फोडाफोडीचे राजकारण आणि अगदी खालच्या पातळीवरील आरोप प्रत्यारोप अशा घाणेरड्या राजकरणाला प्रत्यक्षात सर्वसामान्य मतदार मात्र कंटाळला असल्याचे पाहावयास मिळत आहे. परिणामी यावर्षी २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत वापरण्यात आलेल्या 'नोटा' पर्यायाचा प्रभाव आणखीनच वाढणार असल्याचे बोलले जात आहे.

सन २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत राज्यातील एकूण ४८ लोकसभा मतदारसंघामधुन तब्बल ४लाख ८८ हजार ७६६ मतदारांनी 'या पैकी कोणीही नाही' अर्थात नोटाचे बटण दाबून उमेदवारांप्रति नापसंती व्यक्त केली होती. तर अकोला लोकसभा मतदारसंघात तब्बल ८८४४ मतदारांनी नोटा पर्यायाचा वापर केला होता. हा आकडा तत्कालीन उभ्या असलेल्या पाच अपक्ष उमेदवारांना प्रत्यक्ष मिळालेल्या मतदानापेक्षा कैक पटीने जास्त होता. तद्वतच रिसोड विधानसभा मतदार संघात २३७४ मतदारांनी नोटा पर्यायाचा वापर केला असल्याचे आकडे बोलतात. तर वाशिम विधानसभा मतदार संघात सुद्धा यापेक्षा वेगळी परिस्थीती नव्हती हे सर्वश्रुत आहेच.२०१९ च्या लोकसभा निवडणुकीत, निवडणूक आयोगाच्या आकडेवारी नुसार शहरी भागातील मतदारांपेक्षा ग्रामीण भागातील मतदारांनी नोटाचा वापर अधिक केला असल्याचे स्पष्ट होत असून, २०२४ मधे होत असलेल्या लोकसभा निवडणुकीत नोटाचा प्रभाव आणखीनच वाढणार असल्याची शक्यता निवडणूक कार्यालयातील काही तज्ज्ञांकडून वर्तविण्यात येत आहे.




**खोट्या आश्वासनांची खैरातच कारणीभूत** : आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळून जवळपास आता ७७ वर्षे उलटली आहेत. गेल्या ७७ वर्षात बरीच क्रांती सुद्धा झाली आहे. त्यात प्रामुख्याने आधुनिकीकरण, यांत्रिकीकरण मोठ्या प्रमाणात झाले आहे. तद्वतच शेती – व्यवसायात अमुलाग्र बदल झाला आहे. त्यामुळे लोकांच्या राहणीमानात, विचारसरणीत बदल झाला आहे, मात्र हे बदल घडविण्यासाठी तत्कालीन समाजाला विशेष संघर्ष करावा लागला त्यामुळे हे बदल स्वागतार्ह ठरले आहेत. परंतू एक गोष्ट आजपर्यंत तरी कोणालाही बदलता आली नाही. ती म्हणजे निवडणूक काळात दिली गेलेली आश्वासने होय. म्हणुन अशा खोट्या आश्वासनांची खैरातच "नोटा" चा प्रभाव वाढविण्यास कारणीभूत ठरत असल्याचे सर्व सामान्य लोक बोलत आहेत.



जवळपास सर्वच राजकीय पक्ष उमेदवार देताना, तो सामान्य जनतेच्या कामासाठी योग्य आहे का याचा विचार न करता सामाजिक समीकरणाच्या भरवशावर निवडून येणारा उमेदवार लादतात. असे उमेदवार निवडून आल्यावर सर्वच बाबतीत निष्क्रिय ठरतात याची कित्येक उदाहरणे आहेत. परंतू संविधानाने दिलेला मतदानाचा हक्क बजावने हे आद्य कर्तव्य समजून नाविलाजाने अखेर नोटा दाबून समाधानी व्हावे लागते. **विजय बुधवंत, ( सामान्य मतदार,रिसोड )**



एखादया पक्षाची विचारधारा, त्या पक्षाने सर्व सामान्यांसाठी जाहीर केलेला वचननामा विचारात घेऊन शक्यतो उमेदवारांची निवड केली जाते. परंतू हेच निवडून आलेले उमेदवार स्वत :च्या स्वार्थासाठी, बचावा साठी निवडणूक काळातील विचारधारा, वचननामा पायदळी तुडवून निवडून देणाऱ्यांना वाऱ्यावर सोडून देतात. यामुळे काही सुज्ञ मतदार सुद्धा अखेर नोटा वापरून संबंधित उमेदवाराबद्दल नाराजी व्यक्त करतात. **आर.बी.खडसे, ( मतदार, शेलुखडसे ता.रिसोड )**

# महायुतीच्या उमेदवार चिखलीकर यांच्या प्रचारातून आमदार समर्थक मिस्टर इंडिया!

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** लोकसभा निवडणूकिची राणधुमाळी चालू झाली आहे. महायुतीचे नांदेडचे उमेदवार प्रतापराव पाटील चिखलीकर यांची उमेदवारी जाहीर झाली आहे. नांदेड जिल्हासह संपूर्ण तालुक्यात प्रचार जोरात झालू झाले आहे. पण धर्माबाद तालुक्यातल्या जनतेना वेगळे चित्र पाहायला मिळत आहे. विद्यमान आमदार व प्रतापराव पाटील चिखलीकर यांचे मागिल विधानसभा व लोकसभा निवडणूकी पासून तेरी मेरी आहे असे चित्र खुप वेळस चव्हाट्यावर आले आहे. ते सर्व जनतेने व कार्यकर्ते,तसेच प्रिंट मीडिया मध्ये ते छापलेले सर्व जनतेने पहिले आहे.जसे मतभेद आमदार व खासदार यांच्यात होता च कार्यकर्ते मध्ये सुद्धा दोन भागात विभाजन झाले.त्या नंतर विद्यमान आमदार व प्रतापराव चिखलीकर एकाच बॅनर खाली, पक्षाच्या सभेसाठी व सार्वजनिक कार्यक्रमासाठी सुद्धा आमदार व प्रतापराव पाटील चिखलीकर हे कोणत्याच राजकीय असो किंवा इतर प्लँटफॉम असो एकत्र दिसले नाही.विद्यमान आमदार चिखलीकर यांचे प्रचार जोरात करत असलेतरी धर्माबाद तालुक्यात मात्र आमदार यांचे कार्यकर्ते अद्यापही प्रचार करते वेळस मात्र दिसत नाहीत. महायुतीचे मित्र पक्ष म्हणून जे सक्रिय प्रचार करायला पाहिजे. ते पण दिसत नाही. एकीकडे महाविकास आघाडीचे मित्र पक्ष ज्या उत्साने वसंतराव चव्हाण यांचे प्रचार करण्यात ऊर्जा दाखवत आहेत तेच ऊर्जा आमदारा समर्थक दाखवताना दिसत नाहीत. तसेच महायुतीचे उमेदवार प्रतापराव चिकलीकर यांच्या प्रचार महायुतीचे मित्र पक्ष व आमदार समर्थक ग्राउंड लेव्हला सह तालुक्यात कुठेच प्रचार करते वेळेसचे चित्र मात्र अध्यापही दिसत नाही.आमदार व त्यांच्या पत्नी सौ. पूनमताई ताई पवार ज्या प्रकारे प्रचार ताकतीने, जोमाने करत आहेत. त्याच ताकतीने, तळमळीने धर्माबाद तालुक्यातले आमदार समर्थक काम करते वेळस दिसत नाहीत.यांच्या मुळे जनतेला प्रश्न पडलेला हे एक कोडच आहे. तसेच राजकीय वर्तुळात चर्चांना उद्याण आले आहे.खासदार समर्थक विद्यमान आमदार यांचे कार्यालय असते वेळेस महायुतीचे उमेदवार प्रतापराव चिकलीकर यांचे समर्थक व महायुतीचे सर्व मित्र पक्ष आणि नव्याने भाजपामध्ये पक्ष प्रवेश केलेले खा.अशोकराव चव्हाण यांचे कार्यकर्ते यांनी आर्यभवन समोर धर्मशाळा येथे नवीन कार्यालय चालू करण्यात आले आहे. याच्या मुळे सर्व मतदारासह सर्व कार्यकर्तांना सुद्धा सभ्रम निर्माण झाले आहे. नवनिर्वाचित राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी चे अजितदादा गटाचे शहर पदाधिकारी व कार्यकर्ते सुद्धा प्रचारातून मावळता पाऊल घेताना दिसत आहे. पण राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा गटाचे जिल्हा सरचिटणीस व तालुका पदाधिकारी, चिखलीकर गट,शिवसेना शिंदे गट, नव्यावे भाजपामध्ये पक्ष प्रवेश केलेले खा.अशोकराव चव्हाण यांच्ये कार्यकर्ते सह पदाधिकारी यांनी सुद्धा सक्रिय पणे ग्राउंड लेव्हला प्रचार करताना दिसत आहेत.दोन गटात विभाजलेल्या कार्यकर्तेमळे महायुतीचे उमेदवार प्रतापराव चिखलीकर यांना फायदा होणार की तोटा हे 4 जून ला मतदानाची पेटी खोलल्या नंतरच कळेल.

# भरधाव स्कॉर्पिओला भीषण अपघात

## ४ जण ठार, ५ जण जखमी

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** भरवेगातील वाहन अनियंत्रित होऊन उलटल्याने झालेल्या भीषण अपघातात ३ जण ठार तर पाच जण गंभीर जखमी झाले आहे. यातील एकाला जालना येथे उपचारासाठी हलविण्यात आले आहे. देऊळगाव राजा तालुक्यातील दगडवाडी नजीक आज, बुधवारी १७ एप्रिलला सायंकाळी उशिरा ही भीषण दुर्घटना घडली. घटनेचा विस्तृत तपशील मिळाला नाही. प्राथमिक माहितीनुसार, देशमुख परिवारातील ८ सदस्य देऊळगाव राजा येथून स्कॉर्पिओ वाहनाने जात होते. दगडवाडी नजीक भरवेगातील हे वाहन अनियंत्रित झाल्याने उलटले. यामुळे वाहन रस्त्याखाली गेले. यातील तिघेजण जागीच ठार झाले तर पाच जण गंभीर जखमी झाले. यातील एकाची प्रकृती अत्यावस्थ असल्याने त्याला जालना येथे तातडीने उपचारासाठी हलविण्यात आले. देऊळगाव राजा नजीकच्या



भीषण अपघातातील मृतांची संख्या चार झाली आहे. चौघांवर देऊळगाव राजा येथील ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहे. बुलडाणा जिल्ह्यातील खैरव अंबाशी येथून आठ जण जालना येथे आयोजित लग्नासाठी स्कॉर्पिओने जात होते. दगडवाडी (ता. देऊळगाव राजा) येथे भरवेगात अनियंत्रित होऊन त्यांचे वाहन उलटले. यात वसंत देशमुख (४५), अशोक भीमराव नायक (६५), विलास जयवंत देशमुख (६३) हे जागीच ठार झाले. चालक योगेश लक्ष्मण देशमुख हा अत्यावस्थ झाल्याने त्याला जालना येथे उपचारासाठी नेत असताना त्याचा वाटेतच मृत्यू झाला. गोपाळ आबाराव देशमुख (४३), शालिनी देशमुख (३४), मीरा संजय देशमुख (४०), अक्षरा संदीप देशमुख (१९) या जखमींवर देऊळगाव राजा ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहे.

# उष्णतेत वाढ कायम, अंगाची लाही लाही, रस्ते निर्मनुष्य, दैनंदिन काम ठप्प

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील बाजार सावंगी येथे व परिसरात सर्कलमध्ये सद्या उष्णतेत वाढ कायम असुण अंगाची लाही लाही रस्ते निर्मनुष्य तथा दैनंदिन कामे ठप्प होत असल्याचे चित्र आहे. यंदा कधि नव्हे इतकं कडक उन्ह तापमान पडत असुण त्याचबरोबरच उकडाने घामुघाम होत आहे.

उष्णतेत वाढ कायम असुण उष्णता कडक उन्हामुळे अंगाची लाही लाही होत असुण दुपारी रस्ते निर्मनुष्य दिसत आहे तर आठवडी बाजार तथा विविध कार्यक्रमांत नागरिकांच्या कमीने उन्हाचा परिणाम जाणवून येत आहे.तर कडक उन्हामुळे अंगाची लाही लाही होत असल्याने दुपारी शेतीकाम व इतर कामे करणे अशक्य बनले आहे.सकाळी नऊ दहा वाजेपासूनच कडक उन्ह लागणे सुरु होत आहे.उष्णता तथा कडक उन्हामुळे भुरळ येणे,चक्कर येणे, ताप, सर्दी ,पडसा, लघवी जळजळ,उन्हाळी लागणे



आदि प्रकार घडत आहे.तर दुपारी बाजार पेठा मधे शुकशुकाट दिसून येत आहे. त्या अधूनमधून आभाळ येत असल्याने उकडा वाढला आहे.व यात बालके वृध्द आजारी नागरिक हैराण परेशान झाले आहे. तर गुरेढोरे प्राणी पक्षोपक्षी कसेबसे सैरभैर होताना दिसत आहे. तर दिवसांदिवस उष्णतेत वाढ कायम असुण उष्णता उकडा कडक उन्ह यामुळे नागरिक हैराण परेशान झाले आहे.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in




पंचायती श्री बालाजी मंदिर ट्रस्ट, एसपी रोड चेलिपुरा, छत्रपती संभाजीनगर येथे प्रभु श्रीराम जन्मोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी बालाजी मंदिर ट्रस्टचे शितलसिंग नाईक, दत्तात्रेय भंडारे, प्रभा भोसले (वरे ) कैलास मनिठे, गजानन श्रीरामवार किशोर दडपे, जय भोले क्रीडा मंडळांचे सदस्य, परिसरातील नागरिकांची उपस्थिती होती.

# तालुक्यात अवैध दारूचा महापूर

## दारूबंदी विभागाने अशोका वाईनबार वर टाकली धाड

आधुनिक केसरी न्यूज

**सागर झनके**

**जळगाव जा :** दि.१७ कधी काळी महाराष्ट्र शासनाची दूध महापूर योजना अस्तित्वात होती. तशाच प्रकारची योजना सध्या जळगाव जामोद तालुक्यामध्ये "दारू महापूर योजना"म्हणून अस्तित्वात आहे. जळगाव (जामोद) तालुक्यामध्ये देशी विदेशीची, अधिकृत वाईन बार, असताना सुद्धा ह्यापेक्षा शंभर पटीने अवैध इंग्लिश, देशी, विदेशी दारू दुकाने आहेत. रामनवमीच्या दिवशी देशी दारू दुकाने, बियर बार बंद ठेवण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश असतानाही वाडी खुर्द येथील अशोका वाईन बार व गार्डन रेस्टॉरंट खुलेआम सुरू असल्याचे उत्पादन शुल्क, प्रशासन विभागाचे अधिकारी व्ही. एम.पाटील यांच्या आणि निदर्शनास आले व यांनी तात्काळ संबंधित बारवर धाड टाकून विदेशी मद्य चा साठा जप्त केला व संबंधित अशोका बार आणि गार्डन रेस्टॉरंट वर कठोर कारवाई केली. त्यामुळे अवैध व्यवसायिकांचे धाबे दणाणले आहे.

जळगाव जामोद शहर व तालुक्यामध्ये अवैध दारूचा महापूर आलेला आहे. जळगाव जामोद तालुक्यामध्ये अधिकृत नऊ वाईन बार आहेत, जळगाव शहर परिसरात फक्त एक बार असून आसलगाव ग्रामपंचायत हद्दीत चार बार आहेत. भेंडवळ येथे एक, खांडवी येथे एक आणि जामोद येथे एक असे ९ वाईन बार तालुक्यात आहेत.

संपूर्ण तालुक्यामध्ये सहा देशी दारू विक्रीची दुकाने आहेत. त्यामध्ये ४ दुकाने ही शहरात असून २दुकान हे आसलगाव,जामोद मध्ये आहेत.

ही सर्व दुकाने ही नोंदणीकृत अधिकृत आहेत. यातील वाडी खुर्द येथील अशोका वाईन बार अँड गार्डन रेस्टॉरंट हा शासनाच्या बंदच्या दिवशी सुद्धा खुलेआम बियर आणि विदेशी दारूची विक्री करतो. ह्या दुकान चे नाव अशोका वाईन बार अँड गार्डन रेस्टॉरंट असले तरीही ह्या बारचे किचन हे कायम बंद असते. किचन अटॅच साठीच या वाईन बारला परवानगी असते. परंतु ह्या बारचे संचालक अनंता देवताळू हे आंबेडकर जयंती असो ,रामनवमी असो,१५ ऑगस्ट, २६ जानेवारी असो. प्रत्येक राष्ट्रीय सण उत्सवाला खुलेआम बार उघडा ठेवून मद्य विक्री करीत असतात. त्यामुळेच आज दारूबंदी आणि उत्पादन शुल्क विभागाचे अधिकारी विलास पाटील यांनी संबंधित बारवर धाड टाकून कारवाई केली.

सध्या तालुक्याची अशी स्थिती आहे की अधिकृत देशी दुकान आणि बार मधून दारू कमी विकल्या जाते आणि अवैध धाबे आणि पानपट्टीवर सुद्धा सर्रास दार विक्री होते अधिकृत बार व देशी दुकानदारांना शासनाचा उत्पादन शुल्ककर लाखो रुपयात भरावा लागतो सर्व रेखाट ठेवावा लागतो परंतु या अवैध धंदेवाल्यांना काहीही रेकॉर्ड ठेवावा लागत नाही कर भरावा लागत नाही म्हणून काही दिवसापूर्वी वाईन बार आणि देशी दारू दुकान संघटनेने सर्वे दुकाने बंद करून जिल्हा उत्पादन शुल्क अधिकाऱ्यांकडे चाव्या जमा करायचे ठरवले होते,परंतु जिल्हा उत्पादन शुल्क अधिकारी मॅडम यांनी अवैध धंदे बंद केल्या जातील असे आश्वासन दिल्याने हे प्रकरण तुर्त थांबले होते.

**ह्यापुढे अवैध दारू विक्रेत्यांवर कठोर कारवाई करू : विलास पाटील.**

जळगाव जामोद तालुका आणि शहरात अवैध दारूचा महापूर आलेला आहे . हे सत्य आहे .संपूर्ण बराणपुर रोड आणि अशोका वाईन बार वर बंदच्या दिवशी सुद्धा दारू विकल्या जाते . बंदच्या दिवशी सुद्धा अशोका वाईन बार आणि गार्डन रेस्टॉरंट वर अवैध विक्री होते . त्यामुळे नोंदणीकृत दारू दुकानांचे नुकसान होते .त्यामुळे ह्यापुढे अवैध दारू विक्रेत्यांवर कठोर कारवाई करू असे आश्वासन उत्पादन शुल्क विभागाचे विलास पाटील यांनी दैनिक आधुनिक केसरीशी बोलताना सांगितले .




# नेत्र चिकित्सक डॉ. ओझरकर यांना ऑप्टिकल व्हिजन या विषयात डॉक्टरेट पदवी प्रदान

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** पिंपळनेर येथील प्रसिद्ध नेत्र चिकित्सक डॉक्टर अरुण ओझरकर यांना ऑप्टिकल व्हिजन या विषयात डॉक्टर रेट पदवी प्रदान करण्यात आली आहे. यामुळे त्यांच्यावर अभिनंदन व शुभेच्छांचा वर्षाव होताना दिसून येत आहे. तसेच पिंपळनेर तालुका पत्रकार संघटनेतर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला असून त्याचं कौतक ही करण्यात आलं आहे.

पिंपळनेर येथील सामाजिक क्षेत्रात काम करणारे सुप्रसिद्ध नेत्र चिकित्सक व नेहा व्हिजनचे संस्थापक डॉक्टर अरुण वामनराव ओझरकर यांनी डॉक्टरेट ऑप्टिकल विजन ही पदवी केंब्रिज युनिव्हर्सिटी गोवा येथे व्हॉइस ऑफ चान्सलर व गोव्याचे माजी मुख्यमंत्री दिगंबर कामत यांच्या हस्ते पीएचडी पदवीदान कार्यक्रमात त्यांना सन्मानित करण्यात आले त्यांच्या या यशाबद्दल पिंपळनेर तालुका पत्रकार संघातर्फे अध्यक्ष व जेष्ठ पत्रकार सुभाष जगताप यांच्या हस्ते शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला यावेळी पत्रकार विशाल गांगुर्डे, प्रा. शिवप्रसाद शेवाळे, भिलाजी जिरे,भरत बागुल, चंद्रकांत घरटे, किरण घरटे, विशाल बेनुस्कर, अनिल बोराडे, रवींद्र मराठे, हरिष जगताप, शाकिब सैय्यद, यावेळी उपस्थित होते.सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार जेष्ठ पत्रकार सुभाष जगताप यांनी मानले.



# शिवभूषण पुरस्काराने डॉ. जगदीश पाटील सन्मानित

आधुनिक केसरी न्यूज

**भुसावळ :** येथील रहिवासी तथा बालभारतीच्या मराठी भाषा अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ. जगदीश पाटील यांना भुसावळ शहर शिवजयंती उत्सव समितीतर्फे शिवभूषण पुरस्काराने नुकतेच सन्मानित करण्यात आले. डॉ. जगदीश पाटील यांनी सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, अध्यात्मिक, पर्यावरण यासह विविध क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन त्यांना भुसावळ शहर शिवजयंती उत्सव समितीचे अध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष युवराज लोणारी यांच्या हस्ते शिवभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. भुसावळ रेल्वेस्थानकाजवळ असणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पूर्णाकृती पुतळ्यासमोर आयोजित भव्य समारंभात त्यांना भगवा फेटा परिधान करून भगवी शाल, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. यावेळी जयंती उत्सव समितीचे सचिव उमाकांत नमा शर्मा, राहूल तायडे, मिलिंद कापडे, राजेश भोई, पवन पाटील, हर्षल पाटील, दलजित चौधरी, पंकज हिंगणे यांच्यासह जयंती उत्सव समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.



शहरातील विश्वसनीय
बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | अॅल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर